ज्ञानगंगा घरोघरी

यशवंतराव
चव्हाण
महाराष्ट्र
मुक्त विद्यापीठ

**EDU 425**
**बी. एड. अधिष्ठान अभ्यासक्रम**

# सर्वसमावेशित शिक्षण

**लेखक : डॉ. नवनाथ इंदलकर, डॉ. सीमा इंदलकर, डॉ. कविता साळुंके, डॉ. सुप्रिया काळे**

| | |
|---|---|
| घटक १ : समावेशित शिक्षण : संकल्पना व स्वरूप | १ |
| घटक २ : विशेष गरजा असणाऱ्या बालकांचे शिक्षण | १४ |
| घटक ३ : समावेशित शाळा | ४९ |
| घटक ४ : समावेशित शाळेतील शिक्षक | ६५ |

## यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

## कुलगुरू : प्रा. (डॉ.) दिलीप म्हैसेकर

## प्र. संचालक शिक्षणशास्त्र विद्याशाखा – डॉ. संजिवनी महाले

## तज्ञ सल्लागार समिती

**प्रा.डॉ.माणिकराव साळुंखे**
कुलगुरू, य.च.म.मुक्त विद्यापीठ, नाशिक

**डॉ. कविता साळुंखे**
सहाय्यक प्राध्यापक, शिक्षणशास्त्रि विद्याशाखा, य.च.म.मुक्त विद्यापीठ, नाशिक

**डॉ. सजन थूल**
संचालक, मूल्यमापन विभाग
य.च.म.मुक्त विद्यापीठ, नाशिक

**प्राचार्य डॉ. संजीवनी मुळे**
कॉलेज ऑफ एज्युकेशन,
अंबाजोगाई, बीड४३१५१७

**डॉ. संजीवनी महाले**
प्र. संचालक, शिक्षणशास्त्र विद्याशाखा, य.च.म.मुक्त विद्यापीठ, नाशिक

**डॉ. माधवी धारणकर**
सहाय्यक प्राध्यापक, शिक्षणशास्त्र विद्याशाखा, य.च.म.मुक्त विद्यापीठ, नाशिक

**डॉ. माधुरी सोनावणे**
सहाय्यक प्राध्यापक
कृषी विज्ञान विद्याशाखा
य.च.म.मुक्त विद्यापीठ,

**प्राचार्य डॉ. वाय. एस. राव**
खान्देश एज्युकेशन सोसायटीचे शिक्षणशास्त्र महाविद्यालय, जळगाव

**डॉ. सुरेश पाटील**
सहयोगी प्राध्यापक,
शिक्षणशास्त्र विद्याशाखा,
य.च.म.मुक्त विद्यापीठ, नाशिक

**डॉ. दयाराम पवार**
सहाय्यक प्राध्यापक, शिक्षणशास्त्र विद्याशाखा, य.च.म.मुक्त विद्यापीठ, नाशिक

**डॉ. सुरेंद्र पाटोळे**
सहाय्यक प्राध्यापक, वाणिज्य व व्यवस्थापन, विद्याशाखा,
य.च.म.मुक्त विद्यापीठ, नाशिक

**प्राचार्य भूषण कर्डिले**
ऋतुराज, कौठघाट,
आग्रा रोडजवळ, मुंबई नाका,
भाभा नगर, नाशिक-११

**डॉ. विजया पाटील**
सहाय्यक प्राध्यापक, शिक्षणशास्त्र विद्याशाखा, य.च.म.मुक्त विद्यापीठ, नाशिक

**श्री. सुभाष सोनुने**
सहाय्यक प्राध्यापक,
शिक्षणशास्त्र विद्याशाखा,
य.च.म.मुक्त विद्यापीठ, नाशिक

**प्राचार्य डॉ. नलिनी पाटील**
इंन्स्टिट्यूट ऑफ ॲडव्हान्स स्टडीज इन एज्युकेशन, एस.एन.डी.टी. कॉलेज ऑफ एज्युकेशन, विद्याविहार, कर्वे रोड, पुणे

**डॉ. दीपा डबीर**
उपसंचालक,
टी.आय.एस.एस.
मुंबई

**श्री. विजयकुमार पाईकराव**
सहाय्यक प्राध्यापक, शिक्षणशास्त्र विद्याशाखा, य.च.म.मुक्त विद्यापीठ, नाशिक

**डॉ. मनोज किल्लेदार**
संचालक, आर्किटेक्चर, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा,
य.च.म.मुक्त विद्यापीठ, नाशिक

**प्राचार्य डॉ. रेखा टोपकर**
सांगली एज्युकेशन सोसायटीचे एस.पी.एस. कॉलेज ऑफ एज्युकेशन, राजवाडा, सांगली-४१६४१६


## संपादन व संयोजन


डॉ. कविता साळुंके, शिक्षणशास्त्र विद्याशाखा, य.च.म.मुक्त विद्यापीठ, नाशिक


## निर्मिती


*First Edition developed under DEC development grant.*


© २०१६, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक


- **प्रथम मुद्रण** : मार्च २०१६ ❑ **प्रकाशन क्रमांक** : २१२६
- **मुखपृष्ठ रेखाटन** : श्री. अविनाश भरणे
- **अक्षरजुळणी** : परफेक्ट कॉम्प्युटर, त्रिमूर्ती चौक, सिडको, नाशिक - ९
- **मुद्रक** : श्री. आर. एम. राक्षे, मे. नंदकिशोर फाईन आर्टस, नाईस, सातपूर, नाशिक ४२२००७
- **प्रकाशक** : डॉ. प्रकाश अतकरे, कुलसचिव, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

**EDU 425/B15-16-94**

# कुलगुरूंचे मनोगत

शिक्षणप्रक्रियेत विद्यार्थी हा केंद्रबिंदू आहे. प्रत्येक बालकाच्या शैक्षणिक गरजांची पूर्तता करणे गरजेचे आहे. शिक्षण हक्क कायदा-२००९ नुसार प्रत्येक बालकाला प्राथमिक शिक्षण घेण्याचा अधिकार प्राप्त झाला आहे. प्रत्येक बालकाला प्राथमिक शिक्षण देण्याची जबाबदारी शिक्षण व्यवस्थेची आहे. यासाठी शासन, शिक्षक व पालक यांच्यामध्ये योग्य समन्वय असणे गरजेचे आहे.

सर्वसामान्य बालकांप्रमाणेच विशेष गरजा असणाऱ्या बालकांना शिक्षणाचा हक्क प्राप्त झाला आहे. या बालकांच्या अक्षमतेनुसार आवश्यक सुविधा पुरविण्याची जबाबदारी शिक्षणव्यवस्थेची आहे. विशेष गरजा असणाऱ्या बालकांच्या शिक्षणासाठी समावेशक शिक्षण ही प्रणाली उपयुक्त आहे. समावेशक शिक्षणामध्ये शासन, शासकीय अधिकारी, मुख्याध्यापक, शिक्षक व पालक यांची भूमिका महत्त्वाची ठरते.

सर्वसामान्य शाळेमध्ये, सर्वसामान्य मुलांसोबत विशेष गरजा असणाऱ्या बालकांना अध्ययनाची संधी उपलब्ध करून दिली पाहिजे. सौम्य अपंगत्व असणारी बालके सामान्य बालकांबरोबर शिक्षण घेऊ शकतात. यामुळे त्यांच्यामधील न्यूनगंडाची भावना दूर होते तसेच त्यांचे सामाजिकिकरण होण्यास मदत होते.

सध्याच्या युगात प्रत्येक बालकाच्या कौशल्य विकसनावर भर देण्याची आवश्यकता आहे. विशेष गरजा असणारी बालके राष्ट्र विकासात भरीव योगदान देऊ शकतात. या बालकांच्या शिक्षणाकडे शिक्षकांनी विशेष लक्ष देणे गरजेचे आहे. यासाठी बी.एड. शिक्षण क्रमातील सर्वसमावेशक शिक्षण हा विषय तुम्हाला मार्गदर्शक ठरेल असा विश्वास वाटतो.

– कुलगुरू

# प्रास्ताविक

देशातील प्रत्येक बालकाला मुलभूत प्राथमिक शिक्षण मिळावे यासाठी भारत सरकारने शिक्षणाच्या सार्वत्रिकिकरणाची मोहिम सुरू केली. या मोहिमेला सर्व शिक्षा अभियानामुळे व्यापक स्वरूप प्राप्त झाले. या अभियानामध्ये अपंग समावेशित शिक्षण ही योजना राबविण्यात आली. यातूनच समावेशित शिक्षण ही संकल्पना विकसित झाली.

'समावेशित शिक्षण' या पुस्तकात समावेशित शिक्षणाची संकल्पना, विशेष गरजा असणारी बालके, समावेशित शाळा व शिक्षक या मुद्यांचा विचार केला आहे.

या पुस्तकात एकूण ४ घटक आहेत.

(१) समावेशित शिक्षण : संकल्पनाव स्वरूप

(२) विशेष गरजा असणाऱ्या बालकांचे शिक्षण

(३) समावेशित शाळा

(४) समावेशित शाळेतील शिक्षक

घटक १ मध्ये समावेशित शिक्षणाचा अर्थ, संकल्पना, उद्दिष्टे, वैशिष्टे, समावेशित शिक्षणातील सेवा. समावेशित शिक्षणाचा आराखडा याची माहिती दिली आहे. तसेच समावेशित शिक्षणातील धोरणे व कायदे, विशेष बालकांसाठी असणाऱ्या शासकीय योजना, कर्ज योजना, समाजकल्याण विभागाच्या योजना, अपंगासाठीच्या सोयी सवलती याचे सविस्तर विवेचन केले आहे.

घटक २ मध्ये विशेष गरजा असणाऱ्या बालकांची संकल्पना व अर्थ, बालकांची ओळख. विशेष गरजा असणाऱ्या बालकांची वैशिष्टे, साधने याविषयी माहिती दिली आहे. त्याबरोबरच विशेष बालकांसाठी शैक्षणिक कार्यक्रम सांगितला आहे.

घटक ३ मध्ये समावेशित शाळेचा अर्थ, सामान्य शाळा व समावेशित शाळा, फरक, समावेशित शालेतील भौतिक सुविधा, समावेशित शाळेतील मानवी घटक, अपंगत्वाविषयीचा दृष्टीकोन याची सविस्तर चर्चा केली आहे.

घटक ४ मध्ये समावेशित शाळेतील शिक्षकांच्या संदर्भात शिक्षकाचे अध्यापनविषयक तत्त्वज्ञान अध्यापन पद्धती. अध्यापनाची तंत्रे याविषयक माहिती दिली आहे. तसेच वर्ग जडणघडणीतील शिक्षकाची भूमिका, विशेष गरजा असणाऱ्या बालकांचे समुपदेशन व मार्गदर्शन, पालकांची भूमिका याचे सविस्तर विवेचन केले आहे.

या पुस्तकातून समावेशित शिक्षणाचे स्वरूप जाणून घेणे सहज सुलभ होईल.

**– संचालक , शिक्षणशास्त्र विद्याशाखा**

# प्रास्ताविक

भारतीय घटनेनुसार प्रत्येक बालकाला प्राथमिक शिक्षणाचा मुलभूत हक्क मान्य करण्यात आलेला आहे. शिक्षण हक्क कायदा २००९ मध्ये अपंग बालकांच्या शिक्षणाच्या स्वतंत्रपणे विचार करण्यात आला. त्यानुसार शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण झाले. आज अपंग किंवा विशेष गरजा असणाऱ्या बालकांना दिव्यांग संबोधण्यात येते. दिव्यांगांसंदर्भात भारत सरकारद्वारा दिनांक २७ डिसेंबर २०१६ रोजी The Rights of Persons With Disabilities Act 2016 प्रसिद्ध करण्यात आले.

बालकांच्या अपंगत्त्वाच्या टक्केवारीनुसार त्यांच्या शिक्षणासाठी विशेष शाळा, एकात्मिक शाळा, आणि समावेशित शाळा असे शाळांचे प्रकार निश्चित करण्यात आले. समावेशित शिक्षण संकल्पनेनुसार नियमित शाळेतील शिक्षकांना सामान्य विद्यार्थ्यांसोबत दिव्यांग विद्यार्थ्यांनाही अध्यापन करणे अपेक्षित आहे. शालेय स्तरावरील शिक्षण प्रणालीच्या ह्या गरजेची दखल नॅशनल कौन्सिल फॉर टीचर एज्युकेशन (एन्‌सीटीई) ने २०१४ साली प्रसिद्ध केलेल्या बी. एड. अभ्यासक्रम आराखड्यात घेतलेली दिसते. त्यात ‘समावेशित शिक्षण’ ह्या अभ्यासक्रमाचा स्वतंत्रपणे समावेश करण्यात आलेला आहे.

समावेशित शिक्षण या विषयात समावेशित शिक्षणाची संकल्पना, विशेष गरजा असणारी बालके, समावेशित शाळा व शिक्षक या मुद्यांचा विचार केला आहे.

घटक १ मध्ये समावेशित शिक्षणाचा अर्थ, संकल्पना, उद्दिष्टे, वैशिष्टे, समावेशित शिक्षणातील सेवा. समावेशित शिक्षणाचा आराखडा याची माहिती दिली आहे. तसेच समावेशित शिक्षणातील धोरणे व कायदे, विशेष बालकांसाठी असणाऱ्या शासकीय योजना, कर्ज योजना, समाजकल्याण विभागाच्या योजना, अपंगासाठीच्या सोयी सवलती याचे सविस्तर विवेचन केले आहे.

घटक २ मध्ये विशेष गरजा असणाऱ्या बालकांची संकल्पना व अर्थ, बालकांची ओळख. विशेष गरजा असणाऱ्या बालकांची वैशिष्टे, साधने याविषयी माहिती दिली आहे. त्याबरोबरच विशेष बालकांसाठी शैक्षणिक कार्यक्रम सांगितला आहे.

घटक ३ मध्ये समावेशित शाळेचा अर्थ, सामान्य शाळा व समावेशित शाळा, फरक, समावेशित शालेतील भौतिक सुविधा, समावेशित शाळेतील मानवी घटक, अपंगत्वाविषयीचा दृष्टीकोन याची सविस्तर चर्चा केली आहे.

घटक ४ मध्ये समावेशित शाळेतील शिक्षकांच्या संदर्भात शिक्षकाचे अध्यापनविषयक तत्त्वज्ञान अध्यापन पद्धती. अध्यापनाची तंत्रे याविषयक माहिती दिली आहे. तसेच वर्ग जडणघडणीतील शिक्षकाची भूमिका, विशेष गरजा असणाऱ्या बालकांचे समुपदेशन व मार्गदर्शन, पालकांची भूमिका याचे सविस्तर विवेचन केले आहे.

या पुस्तकातून समावेशित शिक्षणाचे स्वरूप जाणून घेणे सहज सुलभ होईल.

**– संचालक , शिक्षणशास्त्र विद्याशाखा**

# घटक १ : समावेशित शिक्षण : संकल्पना व स्वरूप

**अनुक्रमणिका**

१.० उद्दिष्टे
१.१ प्रास्ताविक
१.२ विषय-विवेचन
१.२.१ समावेशित शिक्षण-अर्थ
१.२.२ समावेशित शिक्षणाची उद्दिष्ट्ये
१.२.३ समावेशित शिक्षणाची वैशिष्ट्ये
१.२.४ समावेशित शिक्षणातील सेवा
१.२.५ समावेशित शिक्षणाचा आराखडा
१.२.६ समावेशित शिक्षणासंदर्भातील धोरणे व कायदे
१.२.६.१ जागतिक स्तरावरील धोरणे व कायदे
१.२.६.२ भारतातील धोरणे व कायदे
१.२.७ विशेष गरजा असणाऱ्या बालकांसाठी शासकीय योजना
१.२.७.१ विविध कर्ज योजना
१.२.७.२ समाजकल्याण विभागाच्या योजना
१.२.७.३ अपंगांसाठीच्या विविध सोयीसवलती
१.३ सारांश
१.४ पारिभाषिक शब्द
१.५ अधिक वाचनासाठी पुस्तके

## १.० उद्दिष्ट्ये

हा घटक अभ्यासल्यावर आपण

(१) समावेशित शिक्षणाचा अर्थ स्पष्ट करू शकाल.

(२) समावेशित शिक्षणाची वैशिष्ट्ये स्पष्ट करू शकाल.

(३) समावेशित शिक्षणाची उद्दिष्टे सांगू शकाल.

(४) समावेशित शिक्षणासंदर्भातील धोरणे सांगू शकाल.

(५) विशेष गरजा असलेल्या बालकांना त्यामुळे होणारे फायदे सांगू शकाल.

## १.१ प्रास्ताविक

आधुनिक काळात शिक्षण व्यवस्थेमध्ये अमुलाग्र बदल होत आहेत. प्राथमिक शिक्षणामध्ये नवनवीन विचारप्रवाह येत आहेत. भारत सरकारने बालकांच्या शिक्षणासाठी २००९मध्ये शिक्षण हक्क कायदा केला. वय वर्ष १४ पर्यंत शिक्षण घेण्याचा अधिकार बालकाला मिळाला.

प्राथमिक शिक्षणाचे कलम भारतीय राज्यघटनेमध्ये मार्गदर्शक तत्त्वामध्ये समाविष्ट होते. शिक्षण हक्क कायद्यानुसार कलम ४५ मुलभूत अधिकारात समाविष्ट करण्यात आले यामुळे प्रत्येक बालकाला प्राथमिक शिक्षण घेण्याचा हक्क प्राप्त झाला. प्रत्येक बालकाला प्राथमिक शिक्षण उपलब्ध करून देण्याची राज्याची जबाबदारी आहे. प्राथमिक शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणासाठी या कायद्यामुळे अनन्यसाधारण महत्त्व प्राप्त झाले. सर्वसामान्य बालकांबरोबर विशेष गरजा असणाऱ्या बालकांनाही शिक्षणाचा अधिकार प्राप्त झाला आहे. यासाठी समावेशित शिक्षणाची योजना राबविण्यात येत आहे. प्रस्तुत प्रकरणात समावेशित शिक्षणाची संकल्पना, तत्त्वे, गरज, शासकीय कायदे व धोरणे यांचे विश्लेषण केले आहे. याबरोबरच विशेष शिक्षण, एकात्मिक शिक्षण व शिक्षण यामधील परस्परसंबंध स्पष्ट केलेला आहे.

## १.२ विषय–विवेचन

### १.२.१ समावेशित शिक्षण–अर्थ

व्यक्तीच्या विकासाचे शिक्षण हे महत्त्वपूर्ण साधन आहे. भारतामध्ये प्राथमिक शिक्षण सार्वत्रिकीकरणाचे उद्दिष्ट पूर्ततेसाठी सर्व शिक्षा अभियान हा कार्यक्रम हाती घेण्यात आला. या अंतर्गत समाविष्ट विविध योजनांपैकी एक महत्त्वपूर्ण योजना म्हणजे अपंगांसाठी समावेशित शिक्षण ही होय. सामान्य बालकांबरोबरच अपंग, अंध, कर्णबधिर, अध्ययन अक्षम मुलांना शिक्षण घेण्याचा अधिकार आहे.

समावेशित शिक्षण म्हणजे शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात सर्वांना सहभागी करून घेणे. विशेष गरजा असणाऱ्या बालकांच्या, सर्वसामान्य शिक्षणाचा 'शिक्षण' अविभाज्य घटक मानला गेला आहे.

**व्याख्या –**

(१) संपूर्ण शिक्षण व्यवस्थेद्वारे विशेष गरजा असणाऱ्या विद्यार्थ्यांना त्यांच्या गरजानुसार सर्वसामान्य शिक्षण योजनेत सहभागी करून घेणे म्हणजे समावेशित शिक्षण होय.

(२) समावेशित शिक्षण म्हणजे विशेष गरजा असणाऱ्या मुलांचा सर्वसामान्य शिक्षण योजनेत सहभाग होय.

(३) समावेशित शिक्षण म्हणजे समाजातील सर्व मुलांच्या शिक्षणासाठी शाळेची रचना व आवश्यक सोयींची उपलब्धता असणे होय.

वरील व्याख्यावरून असे म्हणता येईल की, समावेशित शिक्षण म्हणजे सर्व प्रकारच्या बालकांचा स्विकार करून त्यांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठीची व्यवस्था करणे व या बालकांच्या शिक्षणाची जवाबदारी निश्चित करणे होय.

**सरावासाठी कृती**

समावेशक शिक्षणाबाबत तुम्हाला काय वाटते ? या संकल्पनेचा तुम्हाला उमगलेला अर्थ सांगा.

## १.२.२ समावेशित शिक्षणाची उद्दिष्ट्ये

समावेशित शिक्षणाची उद्दिष्ट्ये पुढीलप्रमाणे

**उद्दिष्ट्ये**

(१) समावेशित शिक्षणाचा अर्थ समजून घेणे.
(२) समावेशित शिक्षणामधील शाळेचे स्वरूप समजून घेणे.
(३) विशेष गरजा असणारी बालके ही संकल्पना स्पष्ट करणे.
(४) दुर्बल (Impairment), असमर्थ (Disable), अपंग (Handicapped) यातील फरक समजून घेणे.
(५) समावेशित शिक्षणाचे महत्त्व समजून घेणे.
(६) समावेशित शिक्षणाची कार्यवाही समजून घेणे.
(७) समावेशित शिक्षणातील शासनाची भूमिका व कार्य समजून घेणे.

वरील उद्दिष्टांच्या परीपुर्ततेसाठी समावेशित योजनेची अंमलबजावणी सुरु करण्यात आली आहे.

## १.२.३ समावेशित शिक्षणाची वैशिष्ट्ये

(०१) सामान्य शाळेत सर्व मुलांना प्रवेश दिला जातो.
(०२) सर्व मुलांच्या गरजांचा विचार करून अध्यापन केले जाते.
(०३) अभ्यासपूरक उपक्रमात सर्व विद्यार्थ्यांचा सहभाग घेतला जातो.
(०४) बालकांच्या आवश्यकतेनुसार वर्गरचनेत बदल केला जातो.
(०५) विशेष गरजा असणाऱ्या बालकांसाठी आवश्यक सर्व सुविधा शाळेमध्ये उपलब्ध असतात. उदा-भिंग, श्रवणयंत्रे, इ.
(०६) बालकांच्या वैयक्तिक गरजानुसार मार्गदर्शन केले जाते.
(०७) प्रत्येक बालकाला त्याच्या क्षमतेनुसार अध्ययनाची संधी दिली जाते.
(०८) पालकांची भूमिका मित्रत्त्वाची व सहकार्याची असते
(०९) गरजु मुले शिक्षणापासून वंचित राहत नाहीत.
(१०) सामान्य मुले व विशेष गरजा असणारी मुले यांच्यामध्ये मित्रत्वाचे संबंध निर्माण होण्यासाठी शिक्षक प्रयत्नशील राहतात.

### सरावासाठी कृती

समावेशक शिक्षणाची वरीलपैकी कोणती वैशिष्ट्ये तुमच्या शाळेला लागू होतात? याची चिकित्सा करा.

## १.२.४ समावेशित शिक्षणातील सेवा

समावेशित शिक्षणात सामान्य बालकांबरोबर विशेष गरजा असणारी बालके शिकत असतात. यामुळे या प्रकारच्या शाळेत काही विशेष सेवांची आवश्यकता असते. समावेशित शिक्षणात विशेष गरजा असणाऱ्या अपंग मुलांना तीन प्रकारच्या सेवा पुरविल्या जातात.

**समावेशित शिक्षणातील सेवा**

१) अत्यावश्यक सेवा    २) सहाय्यक सेवा    ३) अंशतः सेवा

## (१) अत्यावश्यक सेवा

शाळेमध्ये विद्यार्थ्यांच्या अध्ययन सुलभतेसाठी काही आवश्यक सेवा सुविधा पुरवल्या जातात. मानवी स्त्रोतांमध्ये वर्गशिक्षक, पालक आणि सहाध्यायी यांचा समावेश होतो. हे लोक प्रत्यक्ष बालकांच्या अध्ययनास मदत करतात. शिक्षक व पालक यांना विशेष बालकांच्या अध्ययनासंदर्भात प्रशिक्षण दिले जाते. अपंग मुलांना सामान्य सहाध्यायीबरोबर आंतरक्रिया करण्यासाठी प्रेरित केले जाते. विशेष बालकांचे शिक्षण हे शिक्षक, पालक, वर्ग सहकारी यांचे सामुहिक कार्य असून त्यासाठी विशेष प्रयत्नाची आवश्यकता असते.

## (२) सहाय्यक सेवा

समावेशित शाळेतील विशेष गरजा असणाऱ्या बालकांना काही विशेष मानवी व भौतिक सेवा पुरविल्या जातात. मानवी सेवेमध्ये विशेष शिक्षकाचा समावेश होतो. विशेष बालकाच्या गरजेनुसार हे विशेष प्रशिक्षित शिक्षक शाळेमध्ये येऊन अध्यापन करतात. त्यांना मोबाईल शिक्षक असे म्हणतात. या शिक्षकांनी विशेष बालकांच्या अध्यापनासाठी आवश्यक शिक्षण प्रशिक्षण कोर्स पूर्ण केलेला असतो. याबरोबर बालकाच्या अक्षमतेनुसार काही साधनेही पुरवली जातात. श्रवणदोष असलेल्या मुलांना श्रवणयंत्रे, दृष्टीदोष असणाऱ्यांना चष्मे, ब्रेलर, ब्रेलपट्या, अस्थिव्यंग मुलांसाठी कृत्रिम अवयव, चाकाच्या खुर्च्या, इ. साधनांचा पुरवठा केला जातो.

## (३) अंशतः सेवा

समावेशित शिक्षणात पुरविल्या जाणाऱ्या अंशतः सेवा या तात्कालिक स्वरूपाच्या असतात. या सेवांसाठी जिल्हा अपंग पुनर्वसन केंद्र, स्वयंसेवी संस्था कार्यरत असतात. यांच्यामार्फत बालकांच्या अपंगत्वाचे निदान करणे, अपंगत्त्वाचे प्रमाण निश्चित करणे, बालकांच्या आवश्यकतेनुसार साहित्याचा पुरवठा करणे उदा. चाकाची खुर्ची, टेपरेकॉर्डर, प्रोजेक्टर, कृत्रिम अवयव, इ. कार्य केले जाते.

### सरावासाठी कृती

समावेशित शिक्षणासाठीच्या कोणत्या सेवा तुमच्या शाळेत उपलब्ध आहेत? त्याची यादी करा.

## १.२.५ समावेशित शिक्षणाचा आराखडा

समावेशक शिक्षणाची कार्यपद्धती समजण्यासाठी समावेशित शिक्षणाचा आराखडा उपयुक्त ठरेल.




**तक्ता क्र. : समावेशित शिक्षणाचा आराखडा**

**स्त्रोत :** लोकप्रतिनिधीसाठी प्रशिक्षण मार्गदर्शिका, म. रा. शै. सं. व प्र. परिषद, पुणे.

समावेशित शिक्षण व्यवस्था विशेष बालकांसाठी अत्यंत उपयुक्त आहे. यासाठी शिक्षक, पालक, शासन, स्वयंसेवी संस्था यांच्या एकत्रित प्रयत्नांची गरज असते. या बालकांच्या उज्वल भविष्यासाठी पालकांनी व शिक्षकांनी सकारात्मक दृष्टीकोन ठेवणे आवश्यक असते. या सर्वांच्या सामुहिक प्रयत्नातून ही बालके सन्मानाने समाजात आपले जीवन व्यथित करू शकतात.

## १.२.६ समावेशित शिक्षणासंदर्भातील धोरणे व कायदे

अपंगाच्या शिक्षणाबाबतचा पूर्वी समाजाचा दृष्टीकोन हा नकारात्मक होता. अपंगांनाही सर्वसामान्य लोकांबरोबर राहण्याचा व सन्मानपूर्वक आयुष्य व्यथित करण्याचा अधिकार आहे. याबाबतीत जागतिक स्तरावर अनेक धोरण जाहीर करण्यात आली. त्या अनुषंगाने भारत सरकारने स्थापन केलेल्या समित्यांनाही याबाबतीत उपयुक्त मते मांडलेली आहे.

**समावेशित शिक्षणासंदर्भातील धोरणे व कायदे**

| **जागतिक स्तर** | **राष्ट्रीय स्तर** |
|---|---|
| मानवी हक्क जाहीरनामा (१९४८) | भारतीय शिक्षण आयोग (१९६४-६६) |
| सलमनका निवेदन (१९९४) | राष्ट्रीय शैक्षणिक धोरण (१९८६) |
| | राष्ट्रीय अभ्यासक्रम रूपरेषा (२०००) |
| | राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा (२००५) |
| | शिक्षण हक्क अधिनियम (२००९) |

## १.२.६.१ जागतिक स्तरावरील धोरणे व कायदे

### (१) मानवी हक्काचा जाहीरनामा (१९४८)

संयुक्त राष्ट्रसंघाच्या आमसभेने मानवी हक्काचा जाहीरनामा १० डिसेंबर १९४८ रोजी संमत केला. या कायद्याने मानवाचे मुलभूत हक्क अधोरेखित केले. या मधील प्रमुख तरतुदी पुढील प्रमाणे.

(१) सर्व मानव जन्मतः स्वतंत्र असून ते सर्व समान आहेत.

(२) जन्म, सत्ता, संपत्ती, राजकीय दबाव, धर्म, भाषा, लिंग, वर्ण, वंश यांच्या आधारे कोणताही भेदभाव करता येणार नाही.

(३) प्रत्येक व्यक्तीला जगण्याचा, स्वातंत्र्याचा व संरक्षणाचा अधिकार आहे.

(४) सर्व लोक कायद्यासमोर समान असतील.

(५) सर्व लोकांना मानवी हक्काचे उल्लंघन झाल्यास न्याय मागण्याचा अधिकार आहे.

(६) कोणत्याही व्यक्तीला दुसऱ्याच्या वैयक्तिक मालमत्ता, कुटुंब, घर यामध्ये हस्तक्षेप करता येणार नाही. असा हस्तक्षेप अथवा हल्ल्याविरुद्ध दाद मागण्याचा अधिकार प्रत्येक व्यक्तीला आहे.

(७) बालपण हा विशेष काळजीचा कालखंड असतो. बालकांना सामाजिक संरक्षण मिळण्याचा अधिकार आहे.

### (२) सालमनका निवेदन (१९९४)

युनेस्कोने स्पेन मधील सालमनका येथे एका जागतिक परिषदेचे आयोजन केले. या परिषदेत ९२ देशांचे प्रतिनिधी, २५ आंतरराष्ट्रीय स्वयंसेवी संस्था असे ३०० हून अधिक लोक सहभागी झाले. ही परिषद ७ जून ते १० जून १९९४ या कालावधीत पार पडली. या परिषदेचा हेतू विशेष बालकांच्या गरजांची पूर्तता करण्यासाठी समावेशित शिक्षणाचा पुरस्कार करणे व शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणासाठी प्रयत्न करणे हा होता. ही परिषद सालमनका येथे असल्याने या परिषदेच्या निवेदनाला सालमनका निवेदन असे म्हणतात.

**सालमनका निवेदनातील महत्त्वाच्या तरतुदी**

(०१) प्रत्येक बालकाला शिक्षणाचा मूलभूत हक्क आहे.

(०२) प्रत्येक बालकामध्ये व्यक्तीभिन्नता आहे.

(०३) शिक्षण व्यवस्थेने बालकांच्या वैविध्यपूर्ण वैशिष्ट्यांचा विचार केला पाहिजे.

(०४) विशेष बालकांना सामान्य शाळेत प्रवेश दिला गेला पाहिजे.

(०५) समावेशित शाळा प्रणाली ही प्रभावी असून त्याचे सर्वांनी स्वागत करावे.

(०६) शासन संस्थांनी शैक्षणिक व्यवस्था समावेशित करण्यावर भर द्यावा.

(०७) कायदे व धोरणांमध्ये समावेशित शिक्षणाच्या तत्वांचा स्वीकार करावा.

(०८) विशेष बालकांचे पालक व स्वयंसेवी संस्थाचा शालेय व्यवहारात सहभाग वाढवावा.

(०९) बालकांची ओळख व समस्यांचा शोध लहानपणीच घेण्याची व्यवस्था करावी.

(१०) विशेष बालकांच्या अध्यापनासाठी आवश्यक विशेष शिक्षक प्रशिक्षणाची व्यवस्था करावी.

(११) समावेशित शिक्षणात व्यावसायिक शिक्षणाचा समावेश करावा.

## १.२.६.२ भारतातील धोरणे व कायदे

### (१) भारतीय शिक्षण आयोग (१९६४–६६)

डॉ. डी. एस. कोठारी यांच्या अध्यक्षतेखाली नेमण्यात आलेल्या आयोगाने अपंग शिक्षणासंदर्भात पुढील शिफारशी सुचविलेल्या आहेत

(१) विकलांग विद्यार्थ्यांना सामान्य शाळेत दाखल करून घ्यावे.

(२) तीव्र अपंगत्वाच्या विद्यार्थ्यांसाठी जिल्हास्तरावर विशेष शाळा उपलब्ध करून देण्यात याव्यात.

(३) सर्वसामान्य शिक्षकांना अपंगत्वाबाबतच्या प्रशिक्षणाची सुविधा असावी.

(४) स्वयंसेवी संस्थाना अपंग शिक्षणात योगदान देण्यासाठी प्रोत्साहन द्यावे.

(४) अपंगांच्या पुनर्वसनासाठी योजना तयार करावी.

### (२) राष्ट्रीय शैक्षणिक धोरण (१९८६)

१९८६च्या धोरणानुसार अपंगांसाठी एकत्म शिक्षण सुरु करण्यात आले. एकात्म शिक्षण योजनेत अपंग बालकांचे विविध प्रकार होते. या सर्व बालकांना एकात्म शिक्षण योजनेत सामावून घेणे अडचणीचे ठरू लागले. याशिवाय अपंगत्त्वाच्या प्रकारानुसार बालकांची संख्या कमी–जास्त होते. त्यामुळे सर्व बालकांना यामध्ये सामावून घेणे शक्य झाले नाही. १९९२ मध्ये राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाचे पुनरावलोकन करण्यात आले त्यामध्ये पुढील बाबी मांडण्यात आल्या.

(१) प्रशासकीय व्यक्ती व शिक्षकांसाठी मार्गदर्शक कार्यक्रम तयार करणे.

(२) सौम्य मानसिक विकलांग व इतर प्रकारच्या सौम्य अपंगत्व असणाऱ्या बालकांना सामान्य शाळेत सुविधा उपलब्ध करून द्याव्यात.

### (३) राष्ट्रीय अभ्यासक्रम रूपरेषा (२०००)

सन २००० साली राष्ट्रीय शालेय अभ्यासक्रम रूपरेषा तयार झाली. या रुपरेषेमध्ये विशेष गरजा असणाऱ्या बालकांसंदर्भात पुढील बाबी मांडण्यात आल्या.

(१) सेवांतर्गत प्रशिक्षणामधून शिक्षकांमध्ये अपंग मुलांच्या गरजाविषयी संवेदना निर्माण करणे.

(२) विशेष गरजा असणाऱ्या मुलांसाठी पूरक अध्ययन सामग्री विकसित करणे.

(३) शिक्षकांमध्ये आवश्यक कौशल्ये व क्षमता विकसित करणे.

(४) विशेष गरजा असणाऱ्या मुलांसाठी प्राप्त माहितीच्या आधारे मूल्यमापनाची तंत्रे व पद्धती विकसित करणे.

(५) विशेष गरजा असणाऱ्या मुलांना मदत करण्यासाठी सामाजिक संसाधनांचा वापर करणे व संसाधन केंद्र स्थापन करणे.

या अनुषंगाने राज्य पातळीवरील अपंग शिक्षणासंदर्भात प्रयत्न झाले. सर्व शिक्षा अभियानांतर्गत अपंग समावेशित शिक्षण ही योजना राबविण्यात आली. महाराष्ट्र राज्याने २००१ साली महाराष्ट्र राज्य अपंग कल्याण कृती आराखडा तयार केला यामुळे शासनाच्या विविध विभागांमध्ये समन्वय निर्माण झाला.

### (४) राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा (२००५)

राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेच्या (NCERT) कार्यकारी समितीने दि. १४ व १९ जुलै २००४ला झालेल्या बैठकांमध्ये राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखड्याची पुनर्रचना करण्याचा निर्णय घेतला. या पुनर्रचनेसाठी प्रा. यशपाल यांच्या नेतृत्वाखाली एक राष्ट्रीय सुकाणू समितीची स्थापना करण्यात आली. या समितीने राष्ट्रीय अभ्यासक्रमाचा मसुदा तयार केला. या आराखड्यामध्ये विविध गरजा असणाऱ्या बालकांचा शिक्षणासंदर्भात ऊहापोह करण्यात आला आहे. त्याचा सारांश पुढीलप्रमाणे :

(०१) ज्ञानेंद्रीयातील अपंगत्व, मतिमंदत्त्व आणि सभोवतालचे अस्थिर वातावरण यामुळे बालकाला शिकण्यात असमर्थता निर्माण होते. याशिवाय अपुऱ्या अथवा अयोग्य अध्यापनाचा परिणामही या बालकांच्या अध्ययनावर होतो.

(०२) बालकांच्या अध्ययन अडचणींचे निदान व उपचार याबाबत पुरेसे संशोधन झालेले नाही.

(०३) शिकण्यात असमर्थता आहे, तेथे शिक्षकाद्वारे नेहमीच्या पद्धतीने अध्यापन व मूल्यमापन प्रक्रिया राबविण्यात काहीच साध्य होणार नाही. त्यासाठी संशोधन, विशेष निदानासाठीच्या चाचण्या आणि व्यक्तिनिहाय लागू केलेल्या उपाययोजना अशा कार्यक्रमांची आवश्यकता आहे.

(०४) अपंग विद्यार्थ्यांना त्यांच्या गरजांकडे पूर्ण दुर्लक्ष करण्याच्या संवेदनाहीन वातावरणाचा सामना करावा लागतो.

(०५) वर्गामध्ये भेदभाव न करता समानतेचे वातावरण निर्माण करण्याचे महत्त्व शाळांनी लक्षात घ्यायला हवे.

(०६) समावेशितता हे नैतिक तत्त्व आहे, केवळ एक कार्यक्रम नाही.

(०७) अपंगत्व ही एक सामाजिक जबाबदारी आहे तिचा स्वीकार करावा.

(०८) प्रवेश देताना विशेष शैक्षणिक गरजा असणाऱ्या विद्यार्थ्यांना अजिबात नाकारू नये.

(०९) विशेष शैक्षणिक गरजा असणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रवेश नाकारण्यासाठी कोणतीही निवड प्रक्रिया वापरू नये.

(१०) समावेशितता म्हणजे फक्त शारीरिकदृष्ट्या अक्षम असणाऱ्यांचाच समावेश असे नसून कोणालाही बाहेर न ठेवणे म्हणजे समावेशितता होय.

(११) अपंगत्व ही समाजरचित संकल्पना आहे. ही संकल्पना मोडून काढणे महत्त्वाचे आहे.

(१२) विशेष गरजा असलेल्या मुलांचा शालेय कार्यक्रमांच्या नियोजनात सहभाग घ्यावा.

### (५) शिक्षण हक्क कायदा (२००९)

भारत सरकारने २६ ऑगस्ट २००९ रोजी 'बालकांना मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम २००९' हा कायदा केला आहे. या कायद्यानुसार वय वर्ष ६ ते १४ वयोगटातील मुलांना मोफत शिक्षण घेण्याचा हक्क प्राप्त झालेला आहे. या कायद्यामधील सामान्य बालकांसाठीच्या तरतुदी विशेष गरजा असणाऱ्या बालकांसाठी लागू आहेत. याशिवाय काही विशेष तरतुदी पुढीलप्रमाणे.

(१) **भाग–३ कलम–४ –** राज्यशासन किंवा स्थानिक प्राधिकरणाने विकलांग बालकांना शाळेत जाता यावे व प्राथमिक शिक्षण पूर्ण करता यावे यासाठी सुरक्षित परिवहन व्यवस्था करणे.

(२) **भाग–३ कलम–९ –** विकलांग बालकाला शाळेमध्ये शिक्षण घेणे शक्य नसल्यास अशा बालकांना निवासाच्या ठिकाणी विशेष सुविधांची उपलब्धता करून देणे.

(३) **भाग–५ कलम–२१ –** विकलांग बालके ओळखून त्यांची नाव नोंदणी करावी. त्या बालकांच्या अध्ययनात मदत म्हणून अध्ययन साहित्य व इतर सुविधा यांची उपलब्धता करावी तसेच प्राथमिक शिक्षणातील त्यांच्या सहभागाची व प्राथमिक शिक्षण पूर्ण करीत असल्याबाबत खातरजमा करणे.

(४) **भाग–८ कलम–३४ –** राज्य सल्लागार परिषदेवर सदस्य म्हणून विशेष गरजा असलेल्या मुलांच्या शिक्षणाचे विशेषीकृत ज्ञान व प्रत्यक्ष अनुभव असलेल्या व्यक्तीची नेमणूक करणे.

OmUJ{VH$Am{U ^maVr` YmoaUb/H$m`Xo `m§Mr Vw bZmH$éZ g_mZ {e\$magtMr `mXr H$am.

_______________________________________________

_______________________________________________

_______________________________________________

_______________________________________________

_______________________________________________

_______________________________________________

_______________________________________________

## १.२.७ विशेष गरजा असणाऱ्या बालकांसाठी शासकीय योजना

विशेष गरजा असणाऱ्या व्यक्तींसाठी केंद्र व राज्यशासन विविध प्रकारच्या योजना राबविते. या योजनेमुळे या व्यक्तींना आत्मनिर्भर होण्यास मदत होते. या योजनांविषयी थोडक्यात माहिती पुढीलप्रमाणे

### १.२.७.१ विविध कर्ज योजना

(१) **राष्ट्रीय विकलांग वित्त एवम् विकास निगम योजना –** या योजनेअंतर्गत छोटा उद्योग, व्यापार, खरेदी विक्री व्यवसाय यासाठी ३ लाखांपर्यंत कर्ज मिळू शकते. ज्या कारणासाठी कर्ज घेतले आहे, त्याच उद्देशासाठी त्याचा विनियोग करणे आवश्यक आहे. हा व्यवसाय अपंग व्यक्तीने चालविणे बंधनकारक आहे. या व्यवसायामध्ये नोकर ठेवल्यास १५% नोकर हे अपंग असायला हवे.

(२) **कृषी उद्योगासाठी कर्ज –** या योजनेअंतर्गत ५ लाखांपर्यंत कर्ज मिळू शकते. शेती उत्पादन, सिंचन योजना, फळबाग, रेशीम उत्पादन, शेतीसाठी अवजारे, विहीर खोदणे, बी–बियाणे, दुकान, शेतीमालासाठी बाजारपेठ या कारणासाठी कर्ज मिळू शकते

(३) **वाहन खरेदी कर्ज –** या योजनेअंतर्गत ५ लाखांपर्यंत कर्ज मिळू शकते. ऑटोरिक्षा व इतर वाहने या योजनेअंतर्गत खरेदी करता येऊ शकतात.

(४) **मनोरुग्ण व आत्मरुग्ण अपंगासाठी स्वयंरोजगार –** या योजनेअंतर्गत ३ लाखांपर्यंत कर्ज मिळू शकते. या कर्जासाठीचा करार मनोरुग्ण व्यक्तीबरोबर करता येत नसल्यामुळे त्याचे आईवडील, पालक अथवा सहचर (पती अथवा पत्नी) यांच्याशी करार केला जातो.

(५) **लघुउद्योगासाठी कर्ज –** या योजनेअंतर्गत ३ लाखांपर्यंत कर्ज मिळते. यातून साधननिर्मिती, फॅब्रिकेशन आणि उत्पादन करणे आवश्यक असून अपंग व्यक्ती याचा मालक अथवा मुख्य कार्यकारी अधिकारी असावा. या लघुउद्योगात किमान १५% विकलांग व्यक्तींना रोजगार देणे गरजेचे आहे

(६) **मनोरुग्णांच्या लाभासाठी कर्ज योजना –** मनोरुग्णांना त्यांच्या माता–पिता, पालकांद्वारे संचलित संस्थांना या योजनेअंतर्गत ५ लाखापर्यंत कर्ज मिळू शकते. मनोरुग्णांच्या उत्पन्न मिळणाऱ्या साधनांसाठी पालक संघटनेला अर्थसहाय्य केले जाते. मात्र उत्पन्न मिळवण्याच्या प्रक्रियेत मनोरुग्ण व्यक्तीचा सहभाग असणे आवश्यक आहे. तसेच मिळणाऱ्या उत्पन्नात त्यांचा सहभाग आवश्यक आहे.

(७) **वैयक्तिक थेट कर्ज योजना –** अपंग व्यक्तीला कमी भांडवलात छोटासा व्यवसाय करता यावा यासाठी ही योजना कार्यान्वित केलेली आहे. या योजनेअंतर्गत २% व्याजदराने २० हजारापर्यंत कर्ज दिले जाते. हे कर्ज व्याजासहित ३ वर्षात परत करायचे असते.

### सरावासाठी कृती

तुमच्या गावात अथवा शेजारच्या गावात अपंग व्यक्ती असल्यास त्यांना कोणत्या शासकीय योजनांचा लाभ मिळाला आहे कां? याची माहिती मिळवा. त्याची माहिती पुढील चौकटीत लिहा.

______________________________

______________________________

______________________________

______________________________

______________________________

______________________________

## १.२.७.२ समाजकल्याण विभागाच्या योजना

(१) **शालांतपूर्व अपंग शिष्यवृत्ती –** अपंग विद्यार्थिनी स्वावलंबी होण्यासाठी व त्यांना शिक्षण घेता यावे, यासाठी सदर शिष्यवृत्ती योजना राबविली जाते. इ.१ ते इ.१० पर्यंतच्या विद्यार्थिनींना अनुक्रमे रु.५०/–, रु.७५/– व रु.१००/– शिष्यवृत्ती दरमहा मंजूर केली जाते

(२) **अपंगांना सल्ला व मार्गदर्शन केंद्र –** अपंगाना वैयक्तिक सल्ला व मार्गदर्शन करण्यासाठी प्रत्येक जिल्ह्यात अपंग सल्ला व मार्गदर्शन केंद्र सुरु केले जाते. यामार्फत दररोज २० ते २५ अपंगाना मार्गदर्शन केले जाते

(३) **अपंग गुणवत्ता पुरस्कार –** या योजनेत विभागीय मंडळात इ. १० वी व इ. १२ वी मध्ये अंध, कर्णबधिर, अस्थिव्यंग, या प्रवर्गातील प्रत्येकी तीन गुणवत्ताधारकांना रु. १०००/– देण्याची योजना आहे. सदर योजनेअंतर्गत गुणवंत विद्यार्थ्यांना या पुरस्काराने सन्मानित करण्यात येते. सदर योजना विभागीय पातळीवर राबविली जाते.

(४) **अपंगांना लघुउद्योगासाठी वस्तुरूपाने मदत –** या योजनेअंतर्गत जे अपंग मोटार रिवायडिंग, घड्याळे, संगणक, इत्यादी प्रशिक्षण पूर्ण करतात, त्यांना त्यांच्या कामात सुलभता आणण्यासाठी रु. १०००/– पर्यंतची आर्थिक मदत दिली आहे.

(५) **शालांत शिष्यवृत्ती –** अपंग विद्यार्थ्यांना स्वावलंबी होण्यासाठी आवश्यक असणारी शैक्षणिक, व्यावसायिक तसेच तांत्रिक पात्रता प्राप्त करण्यासाठी सदर शिष्यवृत्ती राज्य शासनाकडून प्रदान केली जाते. इ. ११ वी ते पुढील पदवी/ पदव्युत्तर, पदविका, प्रमाणपत्र, औद्योगिक, व्यावसयिक अभ्यासक्रम शिकणाऱ्या अपंग विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती दिली जाते. लाभार्थींना रु. ९०/– ते रु. २१०/– पर्यंत दरमहा शिष्यवृत्ती मंजूर केली जाते.

(६) **बीज भांडवल योजना –** अपंग व्यक्तींच्या पुनर्वसनासाठी स्वयंरोजगारासाठी बीज भांडवल योजना कार्यान्वीत केली आहे. अपंग व्यक्तींना स्वतःचा व्यवसाय, धंदा, उद्योग, शेती पूरक उद्योग सुरु करण्यासाठी शासनाकडून रु. ३००००/– पर्यंत मर्यादेच्या स्वरुपात, प्रकल्प खर्चाच्या २०% अनुदान बीज भांडवल स्वरुपात देण्यात येते. उर्वरित ८०% बँकेकडून कर्ज स्वरुपात उपलब्ध होते. या योजनेअंतर्गत दीड लाखापर्यंत कर्ज मिळू शकते.

(७) **अपंग ओळखपत्र –** अपंगाना ओळखपत्र दिले जाते. हे ओळखपत्र समाजकल्याण अधिकारी व जिल्हा परिषदेमार्फत दिले जाते. त्याचा उपयोग विविध लाभासाठी होतो.

(८) **राष्ट्रीय व राज्य पुरस्कार योजना –** अपंग व्यक्तींची क्षमता वाढविणे व जास्तीत जास्त अपंग व्यक्तींना नोकरी उपलब्ध होण्यासाठी कारखानदार पाहून मालक, अधिकारी यांना प्रोत्साहित करण्यासाठी राज्य पुरस्कार प्रदान करण्यात येतो.

## १.२.७.३ अपंगांसाठीच्या विविध सोयीसवलती

(०१) **कृत्रिम अवयव व साधने पुरविणे –** अपंग व्यक्तीचे पुनर्वसन करण्याच्या दृष्टीने अपंगांसाठी कॅलिपर्स, कृत्रिम अवयव, तीन चाकी सायकल, कर्णबधिरांसाठी श्रवणयंत्र, अंध व्यक्तींना चष्मे, काठ्या, १० वी नंतर शिक्षण घेणाऱ्या अंध विद्यार्थ्यांना टेपरेकॉर्डर व १० कोऱ्या कॅसेट दिल्या जातात. इतर साधनांसाठी ३ हजार रुपयांपर्यंत अर्थसहाय्य दिले जाते. दरमहा दीड हजार रु. उत्पन्न असणाऱ्यांना शंभर % तर दीड हजार उत्पन्न असणाऱ्यांना ५०% अर्थसहाय्य दिले जाते.

(०२) **प्रवासी भाड्यात सवलत –** पूर्णतः अंध, कमी दृष्टी, कुष्ठरोगमुक्त, कर्णबधिर, मतिमंद, मनोविकृत अस्थिव्यंग अपंग व्यक्तींना दिलेल्या पत्राच्या आधारे एस.टी प्रवास भाड्यात ७५% सवलत मिळते. तर त्याच्यासोबतच्या व्यक्तीस ५०% सवलत दिली जाते.

  (१) अंध, अस्थिव्यंग, मतिमंद, अपंग व्यक्तीस तसेच त्याच्या सोबतच्या व्यक्तीस रेल्वे भाड्यात ७५% तर कर्णबधिरांना स्वतःसाठी ७५% सवलत मिळते.

  (२) अंध तसेच ८०% पेक्षा जास्त अपंगत्व असलेल्या अस्थिव्यंग अपंग व्यक्तीस देशांतर्गत विमान प्रवासासाठी एका बाजूच्या प्रवासभाड्यात ५०% सवलत दिली जाते.

(०३) **स्वयंसेवी संस्थेमार्फत कृत्रिम अवयव व साधने –** ही योजना केंद्र शासन पुरस्कृत आहे. या अंतर्गत अपंग व्यक्तींना कृत्रिम अवयव साधने, कर्णबधिरांना श्रवणयंत्र, अंध व मनोविकलांगांना उपयुक्त साधनांसाठी ६ हजार तर कर्णबधिर व बहुविकलांग व्यक्तीसाठी ८ हजार रुपयांपर्यंत अर्थसहाय्य दिले जाते. तसेच प्रवास खर्च व योजना भत्ताही देण्यात येतो.

(०४) **स्वयंसेवी संस्थांना मदत –** स्वयंसेवी संस्थामार्फत चालविण्यात येणाऱ्या अपंगांच्या विशेष शाळा, कार्यशाळा, सेरेब्रल पाल्सीसाठी कार्य करणाऱ्या संस्थांना केंद्र शासनामार्फत अनुदान दिले जाते. स्वयंसेवी संस्थांना या कार्यासाठी प्रोत्साहन देणे, हा या योजनेचा हेतू आहे.

(०५) **अपंग पुनर्वसन केंद्र –** अपंग व्यक्तींचा शोध घेऊन, त्यांचे ग्रामपंचायत, गट व जिल्हा स्तरावरील पुनर्वसन केंद्रामार्फत पुनर्वसन केले जाते. ही योजना चंद्रपूर, लातूर, नाशिक जिल्ह्यात राबविली जाते. तर ग्रामीण पुनर्वसन योजनेअंतर्गत औरंगाबाद, लातूर, बुलढाणा, वर्धा, कोल्हापूर, सिंधुदुर्ग येथेही केंद्रे स्थापन करण्यात आले आहे. या पुनर्वसन केंद्राद्वारे अपंगाना मोफत अथवा अल्पदरात कृत्रिम अवयव व साधने पुरविली जातात. मुंबई येथे केंद्र शासनाच्या वतीने व्यावसायिक पुनर्वसन केंद्र सुरु करण्यात आले आहे. या केंद्रात अपंगांचे व्यावसायिक मूल्यमापन करून त्यांच्यासाठी अल्प मुदतीचे स्वयंरोजगाराचे अभ्यासक्रम राबविले जातात.

मुंबईतील अखिल भारतीय भौतिक चिकित्सा व पुनर्वसन केंद्राद्वारे अस्थिव्यंग अपंगांच्या पुनर्वसन क्षेत्रातील प्रशिक्षण, अस्थिव्यंग अपंगांवर सुधारित शस्त्रक्रिया, कृत्रिम अवयव व साधने बसविण्याचे कार्य केले जाते. कर्णबधिरांसाठी अलियावर जंग येथे नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ हिअरिंग हॅन्डीकॅप, वांद्रा, मुंबई ही संस्था कार्यरत आहे.

(०६) **अपंगांसाठी अभ्यासक्रमात राखीव जागा –** वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये अपंगांसाठी राखीव जागा ठेवण्यात आलेल्या आहेत. वैद्यकीय शिक्षण, दंत वैद्यकीय, शासकीय व अनुदानित आयुर्वेद महाविद्यालयात अपंगाना अनुक्रमे ५, २ व ५ जागा राखीव असतात. तसेच शिक्षणशास्त्र अध्यापक पदविका व पदवी अभ्यासक्रमासाठी ३% आरक्षण ठेवण्यात आले आहे. शासकीय आय.टी.आय.मध्ये शारीरिकदृष्ट्या अपंगांना ३% तर व्यवसाय अभ्यासक्रम राबविणाऱ्या शासकीय व अशासकीय तांत्रिक महाविद्यालयात ३% आरक्षण आहे.

(०७) **वसतिगृहात राखीव जागा –** समाजकल्याण विभागामार्फत चालविण्यात येणाऱ्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांना शासकीय वसतिगृहात ३% जागा अपंगांसाठी राखीव ठेवल्या जातात. समाजकल्याण विभागामार्फत चालविण्यात येणाऱ्या अनुदानित मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या वसतिगृहात प्रवेशासाठी अपंगांना प्राधान्य दिले जाते. आणि ५% जागा राखीव ठेवल्या जातात. शालेय शिक्षण विभागाच्या शैक्षणिक संस्थांमधील वसतिगृहात ३%, तर उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या अधिपत्याखाली असलेल्या वसतिगृहात मंजूर प्रवेशक्षमतेच्या ३% जागा राखीव ठेवल्या जातात.

(०८) **माध्यमिक व उच्च माध्यमिक परीक्षेसाठी सवलत –** दृष्टिहीन, कर्णबधीर, अध्ययन अक्षमता असलेल्या विद्यार्थ्यांना माध्यमिक व उच्च माध्यमिक परीक्षांसाठी वाचक, लेखनिक ३० मिनिटे ज्यादा वेळ, घराजवळ परीक्षा केंद्र, लेखी परीक्षेत आलेख, नकाशे, आकृती, काढण्यात शिथिलता, गणित-शास्त्र अभ्यासक्रमाऐवजी हस्तकलेसारखे दुय्यम विषय देण्यात येतात. अनुत्तीर्ण विद्यार्थ्यांना उत्तीर्ण होण्यासाठी सवलत म्हणून २० गुण दिले जातात.

(०९) **रोजगार व स्वयं रोजगार –** शासकीय व शासन अधिपत्याखालील कार्यालयात वर्ग एक ते चार च्या सरळ सेवा भरतीसाठी अंध/अल्पदृष्टी १%, कर्णबधिर १%, अस्थिव्यंग/मंदमती १% असे ३% आरक्षण आहे. तसेच वयोमर्यादा ४५ वर्षापर्यंत शिथिल करण्यात आली आहे. क व ड गटातील पदोन्नतीसाठी ३% आरक्षण आहे. अस्थिव्यंग अपंगांना टंकलेखनातून सुट देण्यात आली आहे. तसेच अपंग व्यक्तींसाठी मुंबई येथे विशेष सेवायोजन कार्यालय सुरु करण्यात आले आहे. जिल्ह्याच्या जिल्हा रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन कार्यालयात अपंगांचे विशेष रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्र स्थापन करण्यात आले आहे. येथे अपंगांची नाव नोंदणी केली जाते.

(१०) **अपंगांच्या उन्नतीसाठी विशेष सवलती**

(१) नागरी व ग्रामीण विकास योजनातील तीन % निधी अपंगासाठी राखीव ठेवला जातो.

(२) अंध-अपंगाना निवासासाठी तसेच वाणिज्य / औद्योगिक प्रयोजनासाठी २०० चौरस फूट जागा बिना लिलाव प्रचलित बाजारभावाप्रमाणे येणाऱ्या मूल्यांकनानुसार कब्जा हक्काने देण्याची योजना आहे.

(३) स्वयंरोजगारासाठी स्वस्त धान्य दुकान देताना अपंगांना प्राधान्य देण्याच्या सूचना आहेत

(४) म्हाडातर्फे घर व गाळे यांच्या वाटपात २% आरक्षण आहे.

(५) शासकीय सेवेत असलेल्या अपंगांना शासकीय निवासस्थान वाटताना प्राधान्य दिले जाते.

(६) अपंग व्यक्तीने अपंगत्त्वानुसार वाहनात सोईस्कर बदल केल्यास अशा वाहनांना मोटार करातून सवलत दिली जाते.

(७) आवश्यक उपकरणे, वाहन परदेशातून आयात करताना त्यावरील आयात शुल्क माफ करण्यात आले आहे.

(८) मतिमंद पाल्याच्या आई-वडीलांना व्यवसायकरातून सूट मिळते. तसेच एक अथवा दोन्ही हातांनी किंवा पायामध्ये पूर्णतः अपंगत्व, पूर्णतः मूकबधिर व कर्णबधिर, अंध अपंगत्व व्यक्तींनाही व्यवसायकरातून सूट देण्यात आली आहे.

(९) स्थानिक स्वराज्य संस्थेच्या वाहतूक उपक्रमात एस.टी.मध्ये अपंगांसाठी राखीव आसने ठेवण्यात येतात.

### सरावासाठी कृती

तुमच्या शाळेमध्ये अथवा शेजारच्या शाळेमधील विशेष बालकांना कोणत्या शासकीय शिष्यवृत्ती अथवा सोयीसवलती मिळतात? याची माहिती मिळवा. त्याची नोंद पुढील जागेत करा.

______________________________________________

______________________________________________

______________________________________________

______________________________________________

______________________________________________

______________________________________________

## १.३ सारांश

प्राथमिक स्तरावरील शिक्षण प्रक्रियेत अनेक बदल होत आहेत. सर्व शिक्षा अभियानांतर्गत विविध योजना राबविल्या जाऊ लागल्या आहेत. अपंग समावेशित योजना ही त्यापैकीच एक योजना होय. समावेशित शिक्षण ही व्यापक संकल्पना आहे. समावेशित शिक्षण म्हणजे समाजातील सर्वघटकांचे शाळेमध्ये समावेशन होय. समावेशित शिक्षणामध्ये सर्व बालकांनी शिक्षणाच्या मुख्य प्रवाहामध्ये समावेश होणे अपेक्षित आहे.

समावेशित शिक्षणामध्ये विशेष गरजा असणाऱ्या बालकांच्या शिक्षणाचा विचार केला जातो. अंध, विकलांग, कर्णदोष असणारी बालके, अध्ययन सक्षम, इ. बालकांना सामान्य मुलांबरोबर सामान्य शाळेमध्ये शिक्षण घेण्याची व्यवस्था करणे म्हणजे समावेशित शिक्षण होय.

संपूर्ण शिक्षण व्यवस्थेद्वारे विशेष गरजा असणाऱ्या विद्यार्थ्यांना त्यांच्या गरजानुसार सर्वसामान्य शिक्षण योजनेत सहभागी करून घेणे म्हणजे समावेशित शिक्षण होय.

gm_mdoeH$ {ejUmMr C{Ôï>o—समावेशित शिक्षणाचा अर्थ, स्वरूप स्पष्ट करणे, विशेष गरजा असणारी बालके ओळखणे, समावेशित शिक्षणाची कार्यवाही समजून घेणे, त्यांचे महत्त्व जाणणे ही या शिक्षणाची उद्दिष्टे आहेत.

समावेशित शिक्षणामध्ये सामान्य शाळेत सर्व मुलांना प्रवेश दिला जातो. शालेय वातावरण भेदभाव केला जात नाही. बालकांच्या वैयक्तिक गरजांचा विचार करून शिक्षण प्रक्रियेचे स्वरूप बदलले जाते. सामान्य मुले विशेष बालके यांच्यामध्ये मैत्रीभाव निर्माण होण्यासाठी प्रयत्न केले जातात.

**समावेशित शिक्षणात पुढील सेवा दिल्या जातात (१) अत्यावश्यक सेवा (२) सहाय्यक सेवा (३) अंशतः सेवा**

विशेष बालकांसाठी शासनामार्फत विविध योजना राबविल्या जातात. यामध्ये विविध कर्ज योजना, शासकीय सोयी सुविधा, शैक्षणिक सवलती व शिष्यवृत्ती यांचा समावेश होतो.

अपंगांच्या शिक्षणासंदर्भात जागतिक पातळीवर अनेक प्रयत्न झालेले दिसून येतात. विशेषतः युनेस्कोमार्फत यासाठी विविध परिषदांचे आयोजन करण्यात आले. त्यानुसार युनोने काही धोरणे जाहीर केली.

यामध्ये मानवी हक्क अधिनियम (१९४८), सलमनका निवेदन (१९८४), यांचा समावेश होतो. भारत सरकारच्या शिक्षणासंदर्भातील आयोगांनीही अपंग शिक्षणाचे महत्त्व अधोरेखित केले आहे. यामध्ये कोठारी आयोग (१९६४-६६), राष्ट्रीय शैक्षणिक धोरण (१९८०), राष्ट्रीय अभ्यासक्रम रूपरेषा (२०००), राष्ट्रीय शैक्षणिक धोरण (२००५), शिक्षण हक्क अधिनियम -२००९ यांचा समावेश होतो.

समावेशित शिक्षण संकल्पनेचा मागोवा घेताना एकात्मिक शिक्षणाची संकल्पना समजणे आवश्यक ठरते. एकात्मिक शिक्षणानंतर समावेशित शिक्षण ही संकल्पना वापरात आली. एकात्मिक शिक्षणात विशेष बालकांसाठी शाळेमध्ये वेगळी खोली व विशेष शिक्षक याची योजना होती. समावेशित शिक्षणात सामान्य बालकांबरोबर विशेष बालकांचे अध्ययन अशी संकल्पना

आहे. समावेशित शिक्षण ही एकात्मिक शिक्षणापेक्षा व्यापक व सर्वसमावेशित संकल्पना आहे.

## १.४ पारिभाषिक शब्द

| | |
|---|---|
| समावेशित शिक्षण | - Inclusive Education |
| शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण | - Universalization of Education |
| शिक्षण हक्क कायदा | - Right to Education Act |
| मुलभूत अधिकार | - Fundamental Rights |
| दुर्बल | - Impairment |
| असमर्थ | - Disable |
| अपंग | - Handicapped |
| भौतिक सुविधा | - Physical Resources |
| शिक्षक प्रशिक्षण | - Teacher Education |
| मानवी हक्क जाहीरनामा | - Declaration of Human Rights |
| सालमनका निवेदन | - Salamanca Statement |
| राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा | - National Curriculum Framework |

## १.५ अधिक वाचनासाठी पुस्तके

आवचर एस. आर. (२०१०) विशेष शिक्षण, पुणे: नित्यनुतन प्रकाशन.

महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद. (२००९) समावेशित शिक्षण लोक प्रतिनिधींसाठी : प्रशिक्षण मार्गदर्शिका ,पुणे.

राष्ट्रीय अनुसंधान आणि प्रशिक्षण परिषद (एन.सी.इ.आर.टी.) विशेष गरजा असणाऱ्या बालकांचे समावेशन, पुणे

दुनाखे अरविंद (२००४) शैक्षणिक व व्यावसायिक मार्गदर्शन आणि समुपदेशन, पुणे : नूतन प्रकाशन

पाटील मनोज (२०१५) नागरिकांसाठी केंद्र व राज्य शासनाच्या विकास योजना, पुणे : चौधरी लॉ पब्लिशर्स

बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम २००९ (२०१२) मुंबई शालेय व क्रीडा विभाग, मंत्रालय महाराष्ट्र शासन

भोसले रमा व ढोणे उज्वला (२००९) शिक्षणातील बदलते विचार प्रवाह, कोल्हापूर : फडके प्रकाशन.

जाधव मोहन, भोसले आरती व सरपोतदार प्राची (२००३) भारतीय शिक्षणाचा विकास, कोल्हापूर : फडके प्रकाशन.

राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा (२००८) राष्ट्रीय शैक्षणिक व संशोधन प्रशिक्षण परिषद, पुणे.

# घटक २ : विशेष गरजा असणाऱ्या बालकांचे शिक्षण

**अनुक्रमणिका**

२.० उद्दिष्टे
२.१ प्रास्ताविक
२.२ विषय-विवेचन
२.२.१ मतिमंद बालकांचे शिक्षण
२.२.२ दृष्टीदोष असणाऱ्या बालकांचे शिक्षण
२.२.३ कर्णबधिर बालकांचे शिक्षण
२.२.४ शारीरिकदृष्ट्या अपंग बालकांचे शिक्षण
२.२.५ अध्ययन-अक्षमता असणाऱ्या बालकांचे शिक्षण
२.२.६ बालगुन्हेगार बालकांचे शिक्षण
२.२.७ प्रज्ञावान बालकांचे शिक्षण
२.२.८ सर्जनशील बालकांचे शिक्षण
२.३ सारांश
२.४ पारिभाषिक शब्द
२.५ अधिक वाचनासाठी पुस्तके

## २.० उद्दिष्टे

हा घटक अभ्यासल्यावर आपण

(०१) मतिमंद बालकांचे वर्गीकरणानुसार शिक्षण व्यवस्थेची रचना करू शकाल.
(०२) मतिमंद बालकाला ओळखण्याच्या कार्यनिती सांगू शकाल.
(०३) दृष्टीदोष असणाऱ्या बालकांची वैशिष्ट्यांनुसार विविध शैक्षणिक कार्यक्रम सांगू शकाल.
(०४) कर्णबधिर मुलांसाठीचा शैक्षणिक कार्यक्रम स्पष्ट करू शकाल.
(०५) कर्णबधिर मुलांसाठी साधनाचे महत्त्व सांगू शकाल.
(०६) शारीरिक अपंगत्वाची कारणे सांगू शकाल.
(०७) अध्ययन अक्षमतेचे प्रकार विशद करू शकाल.
(०८) बालगुन्हेगारीची कारणे सांगू शकाल.
(०९) प्रज्ञावान बालकांची वैशिष्ट्ये सांगू शकाल.
(१०) सर्जनशील बालकांचा गरजांनुसार शिक्षण देऊ शकाल.

## २.१ प्रास्तविक

विशेष गरजा असणाऱ्या बालकांचे वेगवेगळे प्रकार आहेत. शारीरिक अपंगत्व हा एकमेव प्रकार नसून मानसिक, बौद्धिक व भावनिक क्षेत्रानुसार विशेष गरजा असणारी बालके आहेत. यामध्ये मतिमंद  बालके, दृष्टीदोष असलेली बालके, कर्णबधिर व कर्णदोष असलेली बालके, अध्ययन अक्षम बालके, बालगुन्हेगार, प्रतिभावान व सर्जनशील बालके, इ. प्रकार असलेले दिसून येतात. या बालकांच्या प्रकारानुसार त्यांची वर्तन वैशिष्ट्ये व शैक्षणिक गरजा वेगवेगळ्या असतात. या बालकांची ओळख, त्याच्या अक्षमतेची कारणे, प्रतिबंधात्मक, उपचारात्मक कार्यक्रम, शैक्षणिक कार्यक्रम यांचे प्रत्येक प्रकारानुसार विस्तृत विवेचन प्रस्तुत प्रकरणात करण्यात आले आहे.

## २.२ विषय–विवेचन

### २.२.१ मतिमंद बालकांचे शिक्षण

मानसिक अपंगत्त्व हा अपंगाच्या प्रकारातील अतिशय कठीण असा प्रकार आहे. मतिमंदत्त्व कोणत्याही औषधांनी अगर इंजेक्शनने बरा होणारा आजार नाही. मतिमंद मुलांची बौद्धिक क्षमता सर्वसामान्यांपेक्षा कमी असून ही मुले विकासात मागे राहिलेली दिसून येतात. अपंगांच्या इतर प्रवर्गातील बालकांचा मेंदू सक्षम असतो, पण मानसिक अपंग मुलांच्या मेंदूतील विशिष्ट केंद्रे अकार्यक्षम असतात, त्यामुळे शारीरिक वाढ व मानसिक विकास यात विसंगती आढळते. शिकण्यासाठी या मुलांना त्यांच्या वयाच्या इतर मुलांपेक्षा जास्त वेळ लागतो. अशा मुलांना वर्गात इतर मुलांबरोबर व बाहेरील समाजात समायोजन करणे कठीण जाते. आता सर्व शिक्षा योजनेखाली ही मतिमंद मुले नियमित शाळेत दाखल झाली आहेत. मानसिक अपंगत्त्व दूर करण्यासाठी किंवा त्याची तीव्रता कमी व्हावी आणि सर्वसामान्य मुलांमध्ये त्याचे समायोजन व्हावे यासाठी शासनाने उचलले हे महत्त्वपूर्ण पाऊल म्हणता येईल.

#### २.२.१.१ मतिमंद म्हणजे काय ?

मतिमंदत्त्व ही शारीरिक अवस्था आहे. आजार नव्हे. ज्या व्यक्तींच्या शरीराची वाढ होते. पण तिची मानसिक वाढ खुंटलेली असते त्याला मतिमंद असे संबोधले जाते.

(१) मतिमंदत्त्व म्हणजे बुद्धीचे अपंगत्व होय.

(२) ज्या मुलांचा बुध्यांक ७० पेक्षा कमी असल्याने बौद्धीकदृष्ट्या मागासलेली आहेत त्यांना मतिमंद मुले म्हणतात.

(३) वैकासिक अवस्थांमध्ये सर्वसामान्य बौद्धिक कार्याची वाढ सरासरीपेक्षा कमी आणि समायोजनक्षमतेत कमतरता असते यालाच मतिमंदत्त्व म्हणतात.

(४) वैकासिक अवस्थेत लक्षात येणारी व ज्याचा दुष्परिणाम समायोजित वर्तनामध्ये दिसतो अशा बौद्धिक कार्य करण्याची अक्षमता म्हणजे मतिमंदत्त्व.

(५) Mental retardation refers to individuals who for temporary or long standing reasons function. Intellectually below the age of their peer groups. But social adequacy is not in question or it is in question or it is in question, there is little like that the individual can turn to function independent and adequately in the Community.

– रिंक हेंबर

६) Mental retardation is a state of arrested or incomplete development of mind so severe that the patient is incapable of leading an independent life or of querying himself against serious exploitation in the case of a child that he will be so incapable when an adult.

- Sarson and Dorris

## २.२.१.२ मतिमंदत्त्वाचे प्रकार

**(अ) मतिमंदत्त्वाचे प्रकार** →
- सौम्य मतिमंदत्त्व (Mild)
- मध्यम मतिमंदत्त्व (Moderate)
- कडक / अतितीव्र (Severe mental Retardation)
- गंभीर / अतितीव्र मतिमंदत्त्व (Profound)

(१) **सौम्य मतिमंदत्त्व –** मतिमंदत्त्वाच्या या प्रकारातील मुलांचा बुध्यांक ५०-७० इतका असून या प्रकारात येणाऱ्यांना फारशा अडचणी येत नाहीत. शारीरिकदृष्ट्या ही मुले सक्षम असतात. ही मुले संवादकौशल्य चांगल्या पद्धतीने करतात, परंतु संबोध समजण्यात समस्या येतात. ह्या बालकांना समाजात वावरताना भावनांवर नियंत्रण, स्वावलंबन वर्तन, समस्या ह्यांवर उपाय व उपचार तज्ज्ञ मानसशास्त्रज्ञांच्या साहाय्याने करता येतो.

(२) **मध्यम मतिमंदत्त्व –** या मुलांचा बुध्यांक ३६-४९ इतका असून त्यांच्या आरोग्याच्या बाबतीत तक्रारी दिसून येतात. ही मुले सोप्या पद्धतीने संवाद साधू शकतात. या मुलांना आधाराची गरज असते. तसेच योग्य वातावरण असेल तर कौशल्य शिकून व्यवसायही करू शकतात.

(३) **कडक / तीव्र मतिमंदत्त्व –** या मुलांचा बुध्यांक २०-३४ इतका असतो. शब्दसाठा मर्यादित असून खुणाद्वारे संवाद साधावे लागतात, ही मुले सरावाने काम करू शकतात, पण इतरांची मदत आवश्यक असते. सामाजिक समायोजन कमी असून परस्वाधीन असे जीवन या मुलांचे असते.

(४) **गंभीर / अतितीव्र मतिमंदत्त्व –** या मुलांचा बुध्यांक २० हून कमी असतो. ही मुले पूर्णपणे दुसऱ्यावर अवलंबून असतात. व्यवसाय क्षमता अजिबात नसते व समायोजन ही मुले करू शकत नाहीत. संवाद साधतात. वैद्यकीयदृष्ट्या दुबळी असतात त्यामुळे रोगप्रतिकार शक्ती कमी असते.

**(ब) बुध्यांकानुसार मतिमंदत्त्व व शैक्षणिक वर्गीकरण**

| बुध्यांक | प्रकार | शैक्षणिकदृष्ट्या वर्गीकरण |
|---|---|---|
| ० ते २० | अतितीव्र मतिमंदत्त्व | वैद्यकीय देखरेखीची अवस्था |
| २० ते ३४ | तीव्र मतिमंदत्त्व | मदतीची आवश्यकता |
| ३५ ते ४९ | मध्यम मतिमंदत्त्व | प्रशिक्षण घेण्यास योग्य |
| ५० ते ७० | सौम्य मतिमंदत्त्व | शालेय शिक्षण घेण्यास योग्य |
| ७० ते ९० | सीमारेषेवरील मतिमंदत्त्व (गतिमंद) | शालेय शिक्षण घेण्यास योग्य |
| ९० ते ११० | सर्वसामान्य बुद्धिमत्ता | मतिमंद नाही. |

## २.२.१.३ मतिमंदत्त्वाची ओळख

मतिमंद बालक ओळखण्यासाठी पडताळा सूचीचा वापर करता येतो. मतिमंद बालकाच्या वर्तनाचे निरीक्षण करून या पडताळा सूचीच्या सहाय्याने बालक मतिमंद आहे की अध्ययन अक्षम याचा शोध घेता येतो.

**मानसिक अपंगत्व असलेल्या मुलांसाठी पडताळा सूची**

(०१) पेन्सिल किंवा कात्री नीट धरता न येणे.
(०२) मित्रांशी चेंडू-लगोरी किंवा विटीदांडू खेळता न येणे, खेळाचे नियम न समजणे.
(०३) बरोबरीच्या मुलांशी न पटणे.
(०४) दुसऱ्यांच्या बोलण्याकडे दुर्लक्ष करणे किंवा स्वतःमध्ये मग्न असणे.
(०५) आठवड्याचे वार सांगता न येणे.
(०६) स्वतःच्या गरजा व्यक्त करता न येणे.
(०७) एकाग्रता नसणे.
(०८) तोंडी प्रतिसाद योग्य रीतीने न देणे.
(०९) नवीन गोष्ट शिकताना फार त्रास होणे.

(१०) शिकविलेल्या धड्यांचे आकलन न होणे.
(११) अमूर्त विचार शक्तीचा अभाव असणे.
(१२) कोणतीही गोष्ट समजण्यास इतरांपेक्षा विलंब लागणे.
(१३) प्रथमपुरुशी न बोलणे.

(संदर्भ – आर. सी. आय. पडताळा सूची, फेब्रुवारी २००३)

**अध्ययन अक्षमता असलेल्या बालकांसाठी पडताळा सूची**
(०१) मोजण्यात चुका होणे
(०२) चंचलता असणे.
(०३) वर्गात एकसारखी चुळबुळ करणे.
(०४) उच्चारलेला शब्द बरोबर लिहिता न येणे.
(०५) शब्दाला अयोग्य पूरक अक्षर लावणे.
(०६) उजव्या – डाव्या बाजूमध्ये गोंधळ करणे.
(०७) तोंडी सूचना न समजणे.
(०८) शब्दाला अक्षरांची उलटापालट करणे उदा. पडदा, पदडा, इ.
(०९) आकडे उलट-सुलट लिहिणे.
(१०) गणितात गती नसणे.
(११) दृष्टी चांगली असूनही अनुलेखनात चुका होणे.
(१२) शब्द फार जवळ किंवा दूर लिहिणे.
(१३) भाषा विकासात कमी प्रगती असणे.
(१४) लिहिता न येणे, फार वेळ लागणे.
(१५) आरशातील प्रतिमेप्रमाणे लिहिणे.

(संदर्भ-आर. सी. आय. पडताळा सूची, फेब्रुवारी २००३)

**मतिमंद मुलांना ओळखण्याचे मार्ग**
(१) पालकांशी, शिक्षकांशी चर्चा
(२) निरीक्षणे
(३) प्रमाणित बुद्धिमत्ता चाचण्यांचे आयोजन
(४) शिक्षककृत चाचण्या
(५) केस स्टडी
(६) मानसतज्ज्ञांच्या सहाय्याने
(७) व्यक्तिमत्त्व, अभिरुची चाचण्या

वरीलप्रमाणे पडताळा सूचीतील काही मुद्दे लागू पडत असणारी मुले मतिमंद समजावी. तसेच चाचण्याद्वारे, निरीक्षणे करून आपण मतिमंद मुलांचा शोध घेऊ शकतो व त्यानुसार पुढील कार्यवाही करू शकतो.

## २.२.१.४ मतिमंद मुलांची वैशिष्टे

| बोधात्मक / ज्ञानात्मक वैशिष्टे | शारीरिक वैशिष्टे | भाषिक वैशिष्टे | व्यक्तिमत्व वैशिष्टे |
|---|---|---|---|
| कमी अध्ययन क्षमता | अवयवांची रचना व कार्य निकृष्ट | भाषिक विकास नाही | मित्र नसतात |
| एखादी गोष्ट लवकर विसरतात | हालचालींवर नियंत्रण नसणे. | शब्दसंग्रह कमी | प्रेरणेचा अभाव |
| कमी अवधान कक्षा | कमी उंची | बोलताना अडखळतात | आत्मविश्वास कमी |
| कमी स्मरण शक्ती | छोटे किंवा मोठे डोके | वाक्यरचना करता येत नाही | मर्यादित व्यक्तीभेद |

| | | | |
|---|---|---|---|
| माहिती प्रक्रीयाकरण क्षमता कमी | शारीरिक अवयवांमध्ये समन्वयाचा अभाव | सांकेतिक भाषा समजत नाही | संवेदनशील नसतात |
| गुंतागुंतीच्या कार्यात अडचणी | | | |
| मंद भाषिक विकास | | | |
| निकृष्ट शैक्षणिक क्षमता | | | |

## २.२.१.५ मतिमंदत्त्वाची कारणे

मतिमंदत्त्व हे प्रामुख्याने जैविक व वातावरणीय घटकामुळे येवू शकते, जे बालकांच्या जन्मापूर्वी, जन्मावेळी किंवा जन्मानंतरच्या अवस्थेत संभवतात.

**मतिमंदत्त्वाची कारणे**

↓

(अ) जैविक कारणे (ब) जन्मापूर्वीची कारणे (क) जन्मवेळची कारणे (ड) जन्मानंतरची कारणे

### (अ) जैविक कारणे

(१) **अनुवंश –** अनुवंश हा बालकांच्या शारीरिक व मानसिक विकासातील एक महत्त्वाचा घटक असतो. आई-वडिलांचे शारीरिक व मानसिक गुणधर्म काही मुलात संक्रमित होतात.

(२) डाउन्स सिंड्रोम ए २१व्या गुणसूत्रातील दोष यामुळे १० % लोकांना मतिमंदत्त्व आले आहे.

(३) **जवळच्या नात्यात लग्न –** पती-पत्नी यांचा रक्तगट जुळत असले तर त्यांच्यापासून जन्मणारे मूळ मतिमंद असू शकते.

### (ब) जन्मापूर्वीची कारणे

(१) **गरोदर स्त्रियांचे कुपोषण –** मूळ मातेच्या गर्भात असताना अर्भकाला योग्य पोषक द्रवे न मिळाल्याने मतिमंदत्त्व येण्याची शक्यता असते.

(२) गर्भावस्थेत केलेल्या क्ष-किरण चाचण्यांचा गर्भावर परिणाम होऊ शकतो.

(३) **गरोदर स्त्रीला झालेले आजार –** गरोदरपणातील आईच्या शारीरिक व मानसिक अवस्थांचा गर्भावर अनिष्ठ परिणाम होण्याची शक्यता असते. सिफिलस, रुबेलीया किंवा जर्मन गोवर, जीव विषरक्ता, टॉक्सेझिया यासारखे आजार गर्भावस्थेत झाले तर मातेकडून गर्भाला इजा पोहचण्याची शक्यता असते, परिणामी मतिमंदत्त्व येऊ शकते.

(४) गर्भावस्थेत केलेल्या मादक द्रव्यांच्या सेवनामुळे गर्भावर परिणाम होऊ शकतो.

### (क) जन्मावेळीची कारणे

(१) लवकर किंवा उशिरा जन्म.

(२) प्रसुतीसमयी वैद्यकीय मदत न मिळणे.

(३) जन्मावेळी बाळाला आईकडून प्राणवायू न मिळणे.

### (ड) जन्मानंतरची कारणे

(१) **मेंदूचे विविध आजार –** काही मुले जन्मल्यावर इतर सर्वसामान्य मुलांसारखी असतात परंतु सांसर्गिक रोग, हानिकारक औषधे, डीहायड्रेशन, हायपोम्लॅसेमिया या तत्सम कारणांमुळे मेंदूच्या वाढीवर परिणाम होतो.

(२) **परिस्थितीजन्य घटक –** शारीरिक व मानसिक वाढीवर परिस्थितीजन्य घटकही परिणाम करतात. पौष्टिक व पुरेशा अन्नाचा अभाव, राहण्याची अस्वच्छ जागा आणि सामाजिकदृष्ट्या मागासलेले वातावरण यामुळे ही मुलांच्या शारीरिक व मानसिक वाढीवर परिणाम होऊन मतिमंदत्त्व येते.

## २.२.१.६ मतिमंद मुलांसाठी शिक्षण व्यवस्था

मतिमंद मुलांचे निदान झाल्यावर मतिमंदाच्या स्वरूपानुसार शाळा निवडली पाहिजे. सौम्य व मध्यम मतिमंद मुले नियमित शाळेत दाखल होतील आणि तीव्र व अतितीव्र मुले विशेष शाळेत पाठविली जातील. मानसिक अपंगत्व असलेली मुले किती शैक्षणिक प्रगती करू शकतील? याचा तक्ता संयुक्त राष्ट्रांच्या आरोग्य खात्याने प्रसिद्ध केला आहे तो मार्गदर्शक ठरू शकेल.

**मतिमंद मुलांच्या शैक्षणिक प्रगतीचा तक्ता**

| **वयोगट** | **सौम्य** | **मध्यम** | **तीव्र** | **अतितीव्र** |
|---|---|---|---|---|
| पूर्व प्राथमिक ० ते ५ वर्ष | ● कारक कौशल्य जवळजवळ त्रुटी नाहीत. ● संपर्क कौशल्य साधू शकतात. ● लवकर लक्षात येत नाही. | ● शारीरिक वाढ चांगली. बोलू शकतात, संपर्क साधू शकतात. ● थोडे लक्ष देऊन सांभाळता येते. ● स्वावलंबन कौशल्य प्रयत्नाने येते. | ● शारीरिक विकास प्रगती कमी. ● बोलण्यात दोष ● संपर्क कौशल्य कमी, ● स्वावलंबन शिकविणे कठीण. | ● हालचाल करता येते. ● संवेदना कमी, ● परावलंबी. |
| शालेय गट ६ ते २० वर्षे प्रशिक्षण काळ | ● ५ वी, ६ वी पर्यंतचे शालेय विषय शिकू शकतात. ● समाजात स्थान मिळावे म्हणून मार्गदर्शन करू शकतो. | ● इ. २ री, ३ री पर्यंत प्रगती. ● परिचयाच्या ठिकाणी जाऊ शकतात. ● सामाजीकरणाबाबत शिकविल्यास फायदा होतो. ● व्यावसायिक शिक्षणाचा फायदा होतो. | ● संपर्क साधण्याइतके बोलू शकतात ● आरोग्य सवयी लावता येतात. | ● अगदी थोड्याच गोष्टींचे स्वावलंबन. ● कारक विकास कमी. |
| प्रौढ व्यक्ती | ● व्यावसायिक कौशल्य शिकविता येते. ● चांगल्या सवयी शिकविता येतात. अडचणीच्या वेळी मार्गदर्शन आवश्यक. | ● देखरेखीखाली स्वतःपुरते कौशल्य मिळविण्याची क्षमता. ● मार्गदर्शनाची आवश्यकता. | ● स्वसंरक्षण कौशल्य संपूर्ण येऊ शकेल. ● मार्गदर्शनाखाली थोडासा विकास. | ● थोडासा कारक व भाषिक विकास. ● वैद्यकीय देखरेखरेखाली ठेवणे. ● सेवा सुश्रुषा करावी लागते. |

### मतिमंद मुलांना शिक्षणात येणाऱ्या अडचणी

(१) साध्या साध्या गोष्टी लक्षात ठेवण्यासाठी वारंवार सांगावे लागते.

(२) फळे, भाज्या, झाडे यांच्या नावात गफलत होते.

(३) स्वतःच्या गरजा व्यक्त करता येत नाहीत.

(४) अध्यापन केलेल्या घटकांचे आकलन नीट होत नाही.

(५) अमूर्त विचार शक्तीचा अभाव.

(६) उजवा-डावा, दिशा, वार यामध्ये गोंधळ होणे.

(७) शब्दांच्या अक्षरांची उलटापालट करणे.

(८) किती वर्षे शिकवायचे याबाबत संभ्रम.

(९) मुलातील अस्थिरतेमुळे निर्माण होणाऱ्या अडचणी.

**मतिमंद मुलांसाठी शैक्षणिक कार्यक्रम**

(०१) मुलांच्या गतीनुसार, क्षमतेनुसार शिक्षण द्यावे.

(०२) मतिमंद मुलासाठी जास्त वेळ देणे.

(०३) प्रबलन दृढीकरण यावर भर द्यावा.

(०४) मूर्त समस्या देणे.

(०५) छोट्या तासिका घेणे.

(०६) सराव व उजळणीवर भर देणे.

(०७) बहु माध्यमांचा वापर करावा.

(०८) अनुदेशन साहित्याचे विकसन करावे.

(०९) क्रमन्वित अध्ययनाचा वापर करावा.

(१०) अभ्यासक्रमाची श्रेणी ठरविणे.

(११) गटकार्य, सांघिक अध्ययनचा वापर करणे.

(१२) कठीण विषयाचा आग्रह करू नये.

(१३) अध्यापनात नृत्य, कथा, गायन, हस्तकला यांचा वापर करणे.

(१४) व्यावहारिक ज्ञान द्यावे.

(१५) मूर्त बाबींचा उपयोग करून अध्यापन करणे.

(१६) मतिमंद मुलांच्या शरीराची वारंवार तपासणी करून घ्यावी.

(१७) वर्गातील हुशार मुलांना मतिमंदास सहकार्य करण्यास सांगणे.

(१८) मतिमंद मुलांच्या अडचणी समजावून घेऊन त्या सोडविण्याचा प्रयत्न करावा.

(१९) मतिमंद मुलांच्या भावनिक, शारीरिक, शैक्षणिक विकासासाठी शिक्षकाने प्रयत्न करावे.

शिक्षणाचा उपयोग प्रत्येक व्यक्तीला होतो. मतिमंद मुलांना शिक्षण दिल्याने त्यांना शिक्षणाची माहिती होते, त्यांच्यात शिकण्याची प्रेरणा निर्माण होईल, संप्रेषण, संवादकौशल्य यात सुधारणा होवून मतिमंदाच्या व्यक्तिमत्त्वाचा विकास होईल. या मुलांना शिक्षण मिळाले तर त्यांच्यात स्वरक्षण करण्याची क्षमता निर्माण होईल व जीवनाकडे पाहण्याचा दृष्टीदोष बदलेल. म्हणूनच मतिमंद मुलांना शिक्षण मिळणे अतिशय गरजेचे आहे.

## सरावासाठी कृती

(१) मतिमंद बालकांचे प्रकार / वर्गीकरण सांगून मतिमंदत्त्व बालकांची वैशिष्टे स्पष्ट करा.

______________________________

______________________________

______________________________

______________________________

______________________________

______________________________

(२) मतिमंदत्त्वाची कारणे व उपाय सांगा.

______________________________

______________________________

______________________________

(३) मतिमंद मुलांसाठी कोणता शैक्षणिक कार्यक्रम आखता येईल?

## २.२.२ दृष्टीदोष असणाऱ्या बालकांचे शिक्षण

व्यक्तीच्या जीवनात डोळ्यांना अनन्यसाधारण महत्त्व असून डोळ्याशिवाय जीवन जगणे अत्यंत कठीण असते. आपण दैनंदिन जीवनातील ८०% अनुभव दृष्टीच्या सहाय्याने घेत असतो. सभोवतालच्या वातावरणातील वस्तू, प्रसंग, घटना इत्यादीचे आपण डोळ्यांनी निरीक्षण करत असतो. दृष्टीचा अभाव असणाऱ्यांना कोणकोणत्या अडचणींना सामोरे जावे लागत असेल? याची आपण केवळ कल्पनाच करू शकतो. आपल्या आजूबाजूला डोळ्याच्या समस्या असलेले लोक आपणास दिसतात. त्यामध्ये काहींना दृष्टीचा पूर्णत अभाव असतो तर काहींच्या दृष्टीमध्ये दोष आलेला असतो. अंधत्वामुळे बालकावर ज्या मर्यादा येतात, त्या दूर केल्या म्हणजे बालक काही प्रमाणात सक्षम बनू शकेल.

### २.२.२.१ दृष्टीदोष म्हणजे काय?

(१) ज्या व्यक्तींना दिसत नाही त्यांना अंध व्यक्ती म्हणतात.

(२) अंधत्व म्हणजे दृष्टीचा पूर्ण अभाव, काहीही न दिसणे, दोन्ही डोळ्यांनी ज्यांना दिसत नाही अशा व्यक्तींना समाजात अंध म्हणून संबोधले जाते.

(३) सामान्य व्यक्तीचे दृष्टीक्षेत्र १८०० इतके मर्यादित असते. परंतु काही कारणाने व्यक्तीचे दृष्टीक्षेत्र २०० पर्यंत मर्यादित झाले तर ती व्यक्ती अंध मानली जाते.

(४) जी दृष्टी उत्तमातला उत्तम चष्मा वापरूनसुध्दा ६/६०० वा त्याहूनही कमी आहे. त्याला दृष्टीदोष म्हणतात.

– १९८५ चा अंधत्व नियंत्रणाचा राष्ट्रीय कार्यक्रम.

**दृष्टीदोषाचे प्रकार**



**(१) पूर्णतः दृष्टिहीन (पूर्णतः अंध)**

जन्मतःच ज्या बालकाकडे पाहण्याची क्षमता नसते किंवा अपघात, ऑपरेशन, इ.मुळे दृष्टी गेलेली असते त्यांना अंधबालके म्हणतात.

**(२) मंद दृष्टी**

ज्या व्यक्तीचा दृष्टीदोष शस्त्रक्रिया करून कमी होतो किंवा जी व्यक्ती दैनंदिन व्यवहार करू शकते परंतु दृष्टीदोषाचे प्रमाण ४०% पेक्षा अधिक आहे अशा व्यक्तींना मंद दृष्टीहीन म्हणतात.

**(३) अंशतः अंध**

आवश्यक वैद्यकीय उपचार घेऊनसुध्दा दृष्टी २०/७० किंवा त्यापेक्षा कमी असते त्याला अंशतः अंध म्हणतात.

**(४) शैक्षणिक दृष्ट्या अंध**

जी बालके छापील मजकूर वाचू शकतात. ज्यांना मोठ्या आकारांच्या साधनांची किंवा मोठ्या आकारातील छापील मजकूर असणाऱ्या पुस्तकांची आवश्यकता असते, अशा बालकांना शैक्षणिकदृष्ट्या अंध बालके म्हणतात.

ज्या व्यक्तीच्या दृष्टीमध्ये इतका दोष असतो की, त्या व्यक्ती वाचन करण्यास अक्षम असतात तसेच त्यांना श्राव्य पद्धती किंवा ध्वनिफिती इ. ची आवश्यकता असते. अशा व्यक्तींना शैक्षणिकदृष्ट्या अंध म्हणतात.

## २.२.२.३ अंधत्व येण्याची कारणे




## २.२.२.४ अंधत्व ओळखण्यासाठी पडताळा सूची / अंधांची ओळख

मुलगा अंध आहे हे लवकरात लवकर समजण्यासाठी शिक्षकांनी तसेच पालकांना काही विशिष्ट लक्षणांवर लक्ष द्यावे.

(०१) डोळे सुजणे.

(०२) डोळ्यातून नेहमी पाणी वाहणे.

(०३) रातांधळेपणा असणे.

(०४) एका डोळ्याने पाहणे.

(०५) डोळा नेहमी लाल दिसणे.

(०६) डोळा बंद झाल्यासारखा दिसणे.

(०७) लहान अक्षरांची छपाई वाचण्यास असमर्थ असणे.

(०८) वाचल्यानंतर डोळे दुखणे.

(०९) वारंवार डोळे चोळणे व खाजवणे.

(१०) कोणतीही वस्तू जवळून पाहणे.

(११) एका किंवा दोन्ही डोळ्यामध्ये असलेला काळा भाग पांढरा होणे.

(१२) डोळे बारीक किंवा मोठे करून वाचणे.

(१३) फळ्यावरील पुसट दिसणे.

**अंधत्वावर प्रतिबंधात्मक उपाय**

(०१) गरोदर मातेला पोषक आहार मिळावा.
(०२) गुणसूत्र दोष टाळण्यासाठी नात्यात लग्न टाळावे.
(०३) गर्भावस्थेत गर्भाचे संसर्गजन्य रोगापासून संरक्षण व्हावे म्हणून वेळोवेळी चाचण्या कराव्यात.
(०४) 'अ' जीवनसत्त्व युक्त समतोल आहार बालकास द्यावा.
(०५) संसर्गजन्य रोगापासून दूर राहण्यासाठी लसीकरण करावे.
(०६) बालवयात अपघातापासून मुलांना सुरक्षित ठेवावे.
(०७) डोळ्यात काजळ घालू नये.
(०८) ग्रहणाच्या वेळी काळ्या चष्म्याचा वापर करावा.
(०९) वेळोवेळी नेत्र तपासणी.
(१०) वैद्यकीय उपचाराशिवाय कोणतेही इतर उपचार डोळ्यांवर करू नये.

## २.२.२.५ दृष्टीदोष असणाऱ्या बालकांची वैशिष्ट्ये

(१) **मर्यादित भाषिक विकास –** दृष्टीदोष असणाऱ्या बालकांचा भाषिक विकास सामान्य बालकांच्या तुलनेत कमी प्रमाणात झालेला दिसून येतो. कारण त्यांना दृक अनुभव सामन्यांप्रमाणे मिळत नाही.

(२) **स्पर्शात्मक अवबोध –** अंध व्यक्ती आपल्या स्पर्शज्ञानाच्या साह्यानेच विविध संकल्पना आत्मसात करत असतात.

(३) **अडथळ्यांची जाणीव –** एखादा अंध व्यक्ती जर रस्त्यावरून चालत असेल तर रस्त्यात येणाऱ्या अडथळ्याची त्याला चांगली जाणीव होते.

(४) **सामाजिक कौशल्य आत्मसात करण्यात अडचणी –** व्यक्तीची समायोजन क्षमता कमी असल्याची दिसून येते त्याच बरोबर त्यांच्या चेहऱ्यावरचे हावभाव इ. मुळे सामान्य व्यक्ती त्यांना स्वीकारताना दिसून येत नाही.

(५) **एकाच प्रकारचे वर्तन –** ज्या अंध व्यक्ती चांगले सामाजिक समायोजन साधण्यात अपयशी ठरतात त्या व्यक्ती प्रामुख्याने एकाच प्रकारचे वर्तन करत असल्याचे दिसून येतात. उदा. डोळ्यांची एका विशिष्ट प्रकारे हालचाल, चेहऱ्यावरचे विशिष्ट हावभाव, इ.

## २.२.२.६ दृष्टीदोष असणाऱ्या बालकांसाठी शिक्षण व्यवस्था

सर्वसामान्य मुलांप्रमाणे कमी दृष्टीदोष असणाऱ्या मुलांना सामान्य शाळेत शिक्षण घेणे शक्य होते, त्यांच्यासाठी वेगळ्या अभ्यासक्रमाची गरज असते. महाराष्ट्रात पूर्णतः अंधासाठी व मंददृष्टी मुलांसाठी विशेष शाळा, एकात्म शिक्षण व समावेशित शिक्षण या तीन प्रकारच्या शिक्षण व्यवस्थेतून शिक्षण देण्याची सोय असते. अंशतः दृष्टिहीन असलेल्या बालकांना शक्यतो सामान्य शाळांमध्येच शिक्षण देणे योग्य आहे. या गटातील बहुतेक मुले विविध उपकरणे वापरून सामान्य छापील अक्षरांची पुस्तके डोळ्याजवळ धरून वाचू शकतात. उपकरणांच्या सहाय्याने लेखन वाचन केल्याने डोळ्यांवर विपरीत परिणाम होण्याचा धोका नसतो.

**दृष्टीदोष असणाऱ्या बालकांसाठी शैक्षणिक कार्यक्रम**

(१) **ब्रेल लिपीचा वापर –** ब्रेल लिपी ही अंधाला मिळालेले एक वरदानच आहे. ब्रेल लिपी म्हणजे अंधाचेही डोळे असतात. ब्रेललिपीचा वापर करून लिहिलेल्या पुस्तकांचा आकार मोठा असतो. त्याचबरोबर ती जास्त प्रमाणात उपलब्ध असतात.

(२) **हालचालीचे प्रशिक्षण –** अंध व्यक्तींना दृष्टीदोषामुळे हालचालीवर बंधणे येतात त्यांना चालताना अडचणीचे भान राहत नाही, त्याचबरोबर दिशा समजत नाहीत त्यामुळे त्यांना मुक्त हालचाल करणे अशक्य ठरते यासाठी त्यांना हालचालीचे शिक्षण देणे आवश्यक वाटते. त्यासाठी ते मार्गदर्शक व्यक्ती, लांब काठी, इलेक्ट्रीक साधने यांचा वापर उपयुक्त ठरतो.

(३) **स्मरणशक्तीचे प्रशिक्षण –** जीन्याला पायऱ्या किती, सरळ जायचे की वळायचे, उजवीकडे वळायचे की डावीकडे? चालण्याचा वेग किती ठेवायचा इ. गोष्टी स्मरणात ठेवणे आवश्यक असते म्हणून अंधांना स्मरण शक्तीचे प्रशिक्षण देण्यात येते.

(४) **संवेदनांचे प्रशिक्षण –** शिक्षकांनी वर्गाध्यापन करताना बहुसंवेदन साधनांचा वापर केला पाहिजे. तसेच अंध बालकांना स्पर्श, वास, चव, इ. संवेदनांच्या अनुभवातून शिक्षण द्यावे. दृष्टी बाधित मुलांना डोळ्याव्यतिरिक्त इतर ज्ञानेद्रीयांची कार्यक्षमता वाढविण्याचे प्रशिक्षण द्यावे.

(५) **दैनंदिन कार्यकौशल्य प्रशिक्षण –** सकाळी उठल्यापासून रात्री झोपेपर्यंतची दैनंदिन कामे मुलाला स्वतः करता यावी याचे प्रशिक्षण द्यावे. दृष्टीबाधित बालक दैनंदिन कामे करू शकेल यादृष्टीने आवश्यक ती कौशल्ये त्याला द्यावीत.

(६) **विविध साधनांचा वापर –** तंत्रज्ञानाच्या सहाय्याने अंध व अंशतः अंध व्यक्तीसाठी विविध साधने तयार केली आहेत त्याचा अंधाच्या शिक्षणासाठी उपयोग होतो.

(०१) **लेखन पाटी –** ही विशिष्ट रचना असलेली पाटी असते. विद्यार्थी वयानुसार लेखन पाटीस जोडून एक पट्टी-चीप, सहा टिंबांची रचना व त्याच्या साहाय्याने लेखन करण्यासाठी कलम साधनाचा वापर करावा.

(०२) **ब्रेल लिपीतील पुस्तके –** ब्रेल लिपीतील पुस्तके अक्षरांच्या स्पर्शावरून वाचता येतात.



(०३) **गणित पाटी –** अंकगणित शिकविण्यास उपयोग होतो.



(०४) **गतिशील काठी –** वातावरणाशी परिचय होण्यास आवाज निर्माण होणारी काठी अंधासाठी उपयोगी ठरते. या काठीचा अंध व्यक्तींना फिरण्यासाठी काठीचा उपयोग होतो.

(०५) **रबर मॅट व स्पट व्हील –** उठावाचे नकाशे व आकृत्या काढण्यास सुलभ वापर केला जातो.

(०६) **अबॅसक –** ही मण्यांची पाटी गणितामधील मूलभूत क्रिया शिकण्यासाठी अत्यंत उपयुक्त असते. यावर जलद गतीने गणितीय क्रिया करता येतात.



(०७) **हस्ताक्षर मार्गदर्शिका –** हे आयाताकार उपकरण असते ते धातू, प्लॅस्टिक किंवा लाकडाचे बनविलेले असते. याच्या सहाय्याने निश्चित जागेवर लिहिता येते.

(०८) **वाचन स्टँड –** हा स्टँड खालीवर करून पुस्तकाचे अंतर बदलता येते. आवश्यक तेथे लाईटच्या सहाय्याने प्रकाश पाडता येतो. त्यामुळे आरामात बसून पुस्तक वाचता येते.

(०९) **फेल्ट पेन –** हे काळ्या रंगाचे असल्यास जास्त चांगले. ह्या पेनाचे टोक जाड असते. त्यामुळे चित्र व अक्षर सुस्पष्ट व ठळक दिसते.



(१०) **टेपरेकॉर्डर –** ह्याचा उपयोग नोटस् टेप करण्यासाठी व रेकॉर्ड पुस्तके ऐकण्यासाठी होतो.

(७) **अभ्यासपूरक कार्यक्रम –** संगीत चर्चा, गायन, कथाकथन, अभिनय, नृत्य, इ. कार्यक्रम अंध बालकांसाठी आयोजित करता येतात, ज्यामुळे त्यांचा सर्वांगिण विकास होण्यास मदत होते.

(८) **परीक्षा पद्धती –** सामान्यतः दृष्टीबाधित मुलांसाठी परीक्षांचे नियोजन इतर विद्यार्थ्यांसारखेच असावे, मात्र लेखी परीक्षेस लेखनिक अधिक वेळ द्यावा. मासिक चाचणी, लहान घटक चाचण्या, इ. तोंडी घ्याव्यात. प्रयोगाची माहिती तोंडी विचारावी.

## सरावासाठी कृती

(१) दृष्टीदोष असणाऱ्या बालकांची व्याख्या सांगून दृष्टीदोषाचे प्रकार स्पष्ट करा.

(२) दृष्टीदोष असणाऱ्या बालकांची वैशिष्ट्ये कोणती?

(३) दृष्टीदोष असणाऱ्या बालकांच्या शिक्षणाची व्यवस्था कशी करावी?

## २.२.३ कर्णबधिर बालकांचे शिक्षण

व्यक्तीच्या जीवनात पंचज्ञानेंद्रियांचे महत्त्व अनन्यसाधारण असते कारण त्याद्वारे व्यक्ती ज्ञान ग्रहण करते. कानाद्वारे व्यक्ती श्रवण करून व्यवहार करते, पण जर एखाद्या व्यक्तिला ऐकू कमी येत असेल तर तिच्या दैनंदिन व्यवहारात समस्या निर्माण होतात व त्याचा परिणाम त्या व्यक्तीच्या व्यक्तिमत्व विकासावर होतो. कर्णबधिरपणा वेगवेगळ्या कारणामुळे येतो. त्याचा परिणाम होऊन ऐकण्याच्या बाबतीत मर्यादा येतात, व्यक्तीच्या बोलण्यावर, भाषेवर परिणाम होतो. मुलांचा विकास होत असताना ती अनुभवाने शिकत असतात. कानावर पडणाऱ्या शब्दांमुळे त्यांचा भाषाविकास होत असतो. पण ऐकूच न आल्याने भाषाविकास खुंटतो. त्यामुळे व्यक्तिला समाजात जुळवून घेताना अनेक अडचणींना सामोरे जावे लागते.

### २.२.३.१ कर्णबधिरत्व म्हणजे काय?

कर्णबधिर व्यक्तीमध्ये कानामार्फत होणाऱ्या संवेदनाचा अभाव असल्यामुळे ध्वनी ऐकणे किंवा संभाषण आत्मसात करणे अशक्य होते. कर्णबधिर मुलाला आजूबाजूचे ध्वनी किंवा संभाषण पूर्णपणे ऐकू जात नाही म्हणून भाषा समजणे व बोलणे या दोन्हीचा अभाव दिसून येतो.

**व्याख्या**

(१) ज्या व्यक्तीची चांगल्या कानाचा संभाषण श्रेणीतील श्रवणऱ्हास ६० डेसिबल किंवा त्यापेक्षा अधिक असतो, अशा व्यक्तिला कर्णबधिर म्हणावे. अपंग कायदा (पी. ब्ल्यू. डी. १९९५)

(२) कानातील काही दोषामुळे आवाजाच्या लहरी मेंदूतील श्रवणेंद्रियापर्यंत पोहोचत नाहीत व त्यामुळे व्यक्तिला आवाजाचे ज्ञान होत नाही त्याला कर्णबधिरता म्हणतात.

(३) ज्या व्यक्तीची श्रवणक्षमता इतकी कमी झालेली असते की, त्याला श्रवणयंत्र लावून अथवा न लावता एखाद्याच्या बोलण्याचे आकलन कानाद्वारे होत नाही, त्याला कर्णबधीर व्यक्ती म्हणतात.

(४) ज्या मुलांची श्रवणेंद्रीये ऐकण्याच्या बाबतीत पूर्णपणे निरुपयोगी झालेली असतात, अशांना कर्णबधिर म्हणतात.

(५) एखाद्या व्यक्तीची दुसऱ्याचे बोलणे व वातावरणातील इतर ध्वनी ऐकण्याविषयी अक्षमता म्हणजे कर्णबधिरत्व होय.

**कर्णबधिरत्व कसे ठरविले जाते?**

कर्णबधिरत्त्व ऐकण्याची क्षमता किती आहे? यावर ठरते. ऐकण्याची क्षमता डेसिबल (DB) या एककात मोजतात. आवाजाच्या पट्टीला आवाजाची वारंवारीता म्हणतात. बहिऱ्या व्यक्तीची ऑडीओमिटर ह्या उपकरणाच्या सहाय्याने श्रवणशक्ती मोजली जाते. त्याचे एकक, 'डेसीबल' हे आहे.

### २.२.३.२ कर्णबधिरत्व / श्रवणदोषाचे वर्गीकरण

खालील श्रवणदोष वर्गीकरणास जागतिक आरोग्य संघटनेने मान्यता दिलेली आहे.

| अ.क्र. | श्रवणदोषाचे एकक | श्रवण तीव्रता |
|---|---|---|
| १ | ० ते २५ डी. बी. | सामान्य श्रवणदोष नाही |
| २ | २६ ते ४० डी. बी. | सौम्य श्रवणदोष |
| ३ | ४१ ते ५५ डी. बी. | मध्यम श्रवणदोष |
| ४ | ५५ ते ७० डी. बी. | मध्यम ते तीव्र श्रवणदोष |
| ५ | ७१ ते ९० डी. बी. | तीव्र श्रवणदोष |
| ६ | ९१ ते त्यापुढे | अति तीव्र श्रवणदोष |

### २.२.३.३ कर्णबधिरत्वाची कारणे

कर्णबधीरचे कारणे

(१) अनुवंशीकता

(२) जवळच्या नात्यात लग्न

(३) चुकीचे औषधोपचार

(४) संसर्गजन्य रोग

(५) गरोदरपणातील रोग (उदा. रुबेला)

(६)मातेचे तीव्र व्यसन

(७) कानाला इजा (अपघात)

(८) ध्वनीप्रदूषण (मोठा आवाज)

(९) कुपोषण

(१०) कमी दिवसाचे अशक्त बाळ

### २.२.३.४ कर्णबधिर मुलांची ओळख

(०१) कान सतत दुखणे.
(०२) सर्दीमुळे कमी ऐकू येणे.
(०३) कान सुजणे.
(०४) कान खाजवणे.
(०५) कान फुटणे.
(०६) मोठ्याने बोलले तरच ऐकू येते.
(०७) ऐकण्यासाठी एकच कान पुढे करणारा.
(०८) मागून बोललेले ऐकू येत नाही.
(०९) दुसऱ्या खोलीतील ऐकू येत नाही.
(१०) बोलणाऱ्याच्या ओठाकडे लक्ष देणे.
(११) भरभर बोललेले न समजणे.
(१२) आवाजाच्या दिशेने कान टवकारणे.
(१३) प्रत्येक गोष्ट पुन्हा सांगावी लागणे.



याशिवाय वर्गातील निरीक्षणे, व्यक्ती अभ्यास, मुलाखत व श्रवणचाचण्या आधारे कर्णबधीर बालकांची ओळख करता येते.

**कर्णबधिरत्वावर प्रतिबंधात्मक उपाय.**

(१) डॉक्टरचा सल्ला घेऊनच कानात औषध घालणे

(२) नात्यातील लग्न टाळणे

(३) कर्कश आवाज टाळणे

(४) गर्भावस्थेत आईची काळजी घेणे

(५) कानाची स्वच्छता ठेवणे

(६) कानात कोणतीही वस्तू न घालणे

(७) ताप मेंदूत जाऊ न देणे

(८) कान सतत फुटत असेल तर त्वरित उपाय करणे



### २.२.३.५ कर्णबधिर मुलांची वैशिष्ट्ये

- शाब्दिक संप्रेषणासाठी अकार्यक्षम असतात
- शिक्षक शिकविताना लक्ष देत नाही.
- असाधारण भावनिक वर्तन करतात.
- भाषा विकास नाही.
- अवधान कक्षा कमी असणे.
- स्वसंकल्पना अविकसित असतात.
- आत्मविश्वास कमी असतो.
- व्यक्तिमत्व व सामाजिक विकास कमी असतो.
- लाजाळूपणा असतो.
- आकलन क्षमता कमी असणे.
- एकांतप्रियता असते.

### २.२.३.६ कर्णबधिर बालकांसाठी शिक्षणाची व्यवस्था

प्रत्येक अपंगाच्या क्षमता, संपादन क्षमता, शारीरिक क्षमता भिन्न असतात याचा विचार करून अपंगाच्या शिक्षणाची व्यवस्था केलेली असते. घटनेने प्रत्येक बालकाला शिकण्याचा अधिकार दिला आहे. त्यानुसार महाराष्ट्र शासनाने कर्णबधिरांसाठी, विशेष शिक्षण व्यवस्था केलेली आहे त्यामध्ये विशेष शिक्षण व्यवस्था (तीव्र श्रवणदोष असणाऱ्या बालकासाठी) एकात्म शिक्षण (सौम्य ते मध्यम श्रवणदोष असणाऱ्या बालकासाठी) व समावेशक शिक्षण (सौम्य श्रवणदोष असणाऱ्या बालकांना सामान्य शाळेत सामावून घेणे) यांचा समावेश आहेत.

**कर्णबधिरांसाठी शैक्षणिक कार्यक्रम**

**(१) संपर्क / संप्रेषण कौशल्य विकसन**

विचारांची देवाण घेवाण करण्यासाठी संपर्क कौशल्ये महत्त्वाची ठरतात. ही कौशल्ये कर्णबधिर बालकास अवगत होण्यासाठी प्रयत्न करावेत. यासाठी विविध पद्धतीचा वापर करावा.

- **खुणांची पद्धत** – वाचेचा अंतर्भाव नाही, हाताच्या खुणा व चेहऱ्यावरील हावभाव याला प्राधान्य दिले जाते. हाताच्या आकाराने निरनिराळी अक्षरे दर्शविली जातात. एक किंवा दोन्ही हात वापरतात. प्रत्येक अक्षराला विशिष्ट हस्तचिन्हे वापरतात.




- **मौखिक पद्धत** – आपले विचार वाचेद्वारे मांडण्यास प्रोत्साहन, ओठांची हालचाल व चेहऱ्यावरील हावभाव याला महत्त्व असते.

**(२) भाषा विकास**

कर्णबधिरांच्या भाषा कौशल्य व क्षमतांचे परीक्षण करून झाल्यावर त्या विद्यार्थ्यात प्रगती घडवून आणण्यासाठी विशिष्ट अध्ययन उदिष्टे ठरवली जावीत. कर्णबधिर मुले बोलणाऱ्याच्या ओठांच्या हालचालीवर भाषा जाणून घेतात. त्यासाठी शिक्षकाने एकदा बोलल्यावर मुलाला समजेल नाही तर सावकाश बोलून समजावून सांगावे. मोठ्या आवाजात बोलून वाक्याची पुनरावृत्ती करावी. यामुळे मुलांचा भाषिक विकास होण्यास मदत होईल.